पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला अमरावती ■ वर्ष १५ ■ अंक १८५ ■ रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## एकावेळी एकाच वॉर्डाची होणार मतमोजणी!

प्रतिनिधी ११ जानेवारी

**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आणि दुसऱ्या दिवशी १६ जानेवारी रोजी मतमोजणी होत आहे. पण पालिका निवडणुकीत सर्वच वॉर्डची मतमोजणी आता एकाचवेळी होण्याची शक्यता धूसर असल्याचे समोर येत आहे. एकाचवेळी एकाच वॉर्डची मतमोजणी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे निवडणुकीचे निकाल रखडण्याची शक्यता आहे. अगोदर टपाली मतदान मोजणी होईल. तर त्यानंतर वॉर्डनिहाय मत मोजणी होईल. त्यामुळे दुपारी स्पष्ट होणारे निकालाचे चित्र मध्यरात्रीपर्यंत स्पष्ट होईल की नाही, याची शाश्वती नाही.

## कुख्यात रहेमान डकैतच्या मुसक्या आवळल्या!

प्रतिनिधी ११ जानेवारी

**सुरत :** भोपाळचा कुख्यात गुन्हेगार आबिद अली उर्फ राजू इराणी उर्फ 'रेहमान डकैत', जो दोन दशकांपासून देशभरातील पोलिसांसाठी डोकेदुखी ठरला होता, त्याला अखेर सुरत गुन्हे शाखेने अटक केली आहे. भोपाळच्या कुख्यात इराणी डेरामधून देशव्यापी गुन्हेगारी नेटवर्क चालवणारा हा गुंड १४ राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या टोळ्यांचा म्होरक्या असल्याचे म्हटले जाते. सुरतच्या लालगेट भागात गुप्त कारवाईदरम्यान त्याला एकही गोळी न चालवता अटक करण्यात आली. गुन्हे शाखेच्या म्हणण्यानुसार, आरोपी २० वर्षांपासून बनावट सीबीआय अधिकारी, साधू किंवा बाबा म्हणून भासवत दरोडा, फसवणूक, हिंसक कृत्ये आणि हत्येचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे करत होता. त्याच्यावर महाराष्ट्रात कडक मकोका (संगठित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) कायद्यांतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यात काही दिवस थंडी कायम राहील!

प्रतिनिधी ११ जानेवारी

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून शहरातील किमान तापमानात मोठी घट झाली आहे. मागील तीन दिवसांपासून किमान तापमान १० अंशाच्या खाली नोंदविण्यात येत आहे. पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस थंडी कायम राहणार असल्याची शक्यता आहे. राज्यात काही दिवसांपूर्वीच तापमान ५ सेल्सिअसपर्यंत खाली जाताना दिसले. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील काही दिवस हवामानात चढउतार बघायला मिळेल. अमृतसरमध्ये देशातील नीचांकी तापमानाची नोंद झाली असून तिथे १.३ तापमान नोंदवले गेले. राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद धुळ्यात झाली असून धुळ्यात ६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. परभणीमध्ये ६.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. जळगाव, मालेगाव, नाशिक, गोदिंया, भंडारा, नागपूर येथे १० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

# पाच वर्ष पाणीपट्टी वाढीला स्थगिती

**▶▶ लाडक्या बहिणींना बेस्टमध्ये 50 टक्के सवलत ▶▶ महायुतीकडून मुंबईकरांसाठी घोषणांचा पाऊस**



प्रतिनिधी ११ जानेवारी

**मुंबई:** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून वचननामा प्रसिद्ध करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत वचननामा जाहीर करण्यात आला. दोन लाख नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन हा वचननामा तयार करण्यात आला आहे. या वचननाम्यात झोपडपट्टीमुक्त मुंबई करणे, २० ते ३५ लाख घरांची निर्मिती करणे, बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ तयार करणे, पाच वर्षासाठी पाणीपट्टी वाढीला स्थगिती, धारावीचा विकास हा डीआरपी करणार, ३५० स्के. फूटपर्यंत आम्ही धारावीतच घरे देणार, अशा बड्या घोषणा मुंबईकरांसाठी करण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीचा वचननामा जाहीर करत आहोत. मुंबई महापालिका निवडणुक १५ तारखेला पार पडत आहे. मुंबईकरांच्या दररोजच्या जीवनात बदल घडवेल असं वचन आम्ही देत आहोत. १६ तारखेला महायुतीचा भगवा महापालिकेवर फडकेल. मुंबईच्या विकासासाठी जे करायचं आहे ते आम्ही मांडत आहोत. अडीच वर्ष मी मुख्यमंत्री होतो. त्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत. मुंबईत आलेल्या मराठी माणसाचे रक्षण करणे, संस्कृती जतन करणे आमच काम आहे. मुंबईकर कल्याण-डोंबिवली अंबरनाथपर्यंत गेला याला जबाबदार कोण? याचा विचार व्हायला हवा, असे त्यांनी म्हटले.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, मुंबई पागडीमुक्त करण्याचा आम्ही निर्णय घेतला. जिथ ओसी मिळत नव्हती, त्यामुळे पाणीपट्टी दुप्पट येत होती ते देखील बंद केले. झोपडपट्टीमुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांच स्वप्न होतं ते देखील आम्ही पूर्ण करणार आहोत.

### लाडक्या बहिणीसाठी बेस्ट भाडे ५० टक्के करणार

२० ते ३५ लाख घरांची निर्मिती करण्याचा आमचा मानस आहे. पंतप्रधान गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्यावर सातत्याने टीका करत आहेत की, मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार परंतु असं कदापी होणार नाही. आम्ही लाखो तरुणांना रोजगार देणारे लोक आहोत. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्ष आम्ही महापालिकेची मदत घेऊन साजरे करणार आहोत. बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ करणार आहोत. लाडक्या बहिणीसाठी बेस्ट भाडे ५० टक्के करणार आहोत. लघू उद्योजकांना ५ लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार आहोत. पुनर्विकासाठी कोणतेही अडथळे येणार नाहीत याची व्यवस्था केली आहे. पाच वर्षासाठी पाणीपट्टी वाढीला स्थगिती देऊ, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### मुंबईकरांना मुंबईबाहेर जाऊ देणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महायुतीचा वचननामा जाहीर केला आहे. इतर कुणीही वचननामा दिला तरीही त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड आणि आमचा ट्रॅक रेकॉर्ड मोठा असेल. पुढील पाच वर्षानंतर आम्ही काय-काय केलं याचा एक रिपोर्ट जनतेसमोर आम्ही मांडू. काही ठिकाणी उंचीची अडचण निर्माण होत आहे. याच्यावर काम करत आहोत. रडार सिस्टीम ठिकाण बदलता येईल का? यासाठी प्रयत्न करत आहोत. मुंबईकरांना मुंबईबाहेर जाऊ देणार नाही. काही लोक बोलत राहिले आम्ही मात्र करून दाखवलं. बीडीडी, अभ्युदय नगर, विशाल सह्याद्री नगर याचे उदाहरण आहे.

### ३५० स्के. फूटपर्यंत आम्ही धारावीतच घरे देणार

आधी विकासक लोकांना २०-२० वर्ष घरे देत नव्हते. परंतु आता पुनर्विकास म्हाडा करणार आहे. देखरेखीसाठी आम्ही विकासक देऊ. त्याने कामात काही कमी जास्त केलं तर त्याचे सगळे अधिकार हे म्हाडाला जातील. धारावीचा विकास हा डीआरपी करणार आहे. ३५० स्के. फूटपर्यंत आम्ही धारावीतच घरे देणार आहोत. महानगर पालिकेत काम करणाऱ्या सफाई कामगारांसाठी आम्ही घरे देणार आहोत. २०१९ मध्येच हे होणार होतं. मात्र, उद्धव ठाकरे यांनी निर्णय बदलला होता. आता मात्र आम्ही त्यांना हक्काचे घर देणार आहोत. महापालिका शाळा कौशल्ययुक्त करणार आहोत. मराठी लँगवेज लॅब तयार करणार आहोत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## लाडक्या बहिणीचे प्रलंबित हप्ते निवडणुकीनंतर द्या!

प्रतिनिधी ११ जानेवारी

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६चा हप्ता निवडणुकीनंतर द्यावा, अशी मागणी काँग्रेसने शनिवारी केली. हे दोन्ही हप्ते महापालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशी देण्याचा घाट राज्य सरकारचा घातला असून या प्रकार निवडणुकीवर प्रभाव टाकू शकतो, अशी भीती काँग्रेसने वर्तवली आहे.

राज्य सरकारकडून विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत प्रतिमहिना १५०० रुपयांचा हप्ता लाभार्थी महिलांना देण्यात येत आहे. या योजनेतील लाभार्थ्यांना नोव्हेंबर २०२५चा अखेरचा हप्ता देण्यात आला आहे. डिसेंबर २०२५ आणि



जानेवारी २०२६ या दोन्ही महिन्यांचा हप्ता प्रलंबित असून हे दोन्ही हप्ते महानगरपालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशी देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेसने केला. त्यामुळेच हे दोन्ही हप्ते निवडणुकीनंतर द्यावेत, अशी मागणी कोंडविलकर यांनी निवेदनाच्या माध्यमातून केली आहे. 'लाडकी बहीण योजनेला आमचा विरोध नाही. प्रलंबित हप्ते एकाचवेळी निवडणुकीपूर्वी दिले तर ही बाब राज्यातील एक कोटी महिलांना प्रभावित करू शकेल, तर निवडणुकीच्या दिवशी मतदान सत्तारुढ पक्षाच्या उमेदवारांना करण्यास प्रवृत्त करणारा हा प्रकार आहे', असे कोंडविलकर म्हणाले.

### 'लाडकी बहीण'चा आनंद काँग्रेसला बघवत नाही : बावनकुळे

महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींबद्दलचा द्वेष काँग्रेसच्या मनात ठासून भरला आहे. आमच्या माता-भगिनींच्या चेहऱ्यावरचा आनंद काँग्रेस नेत्यांना बघवत नाही. लाडकी बहीण योजनेचे पैसे बहिणींच्या खात्यात जमा होऊ नयेत, यासाठी काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहून आपला विकृत चेहरा समोर आणला आहे,' अशी घणाघाती टीका भाजपचे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुख व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. तर राज्यात महापालिका निवडणुका सुरू असल्यामुळे महिला मतदारांना लाडकी बहीण योजनेचा निधी देऊ नये ही काँग्रेसची मागणी म्हणजे गरीब महिलांची संक्रात खराब करण्याचे कुटील कारस्थान आहे.

## भाजपा 'त्या' निर्णयाचा ८० ठिकाणी करणार निषेध!

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** लाडक्या बहिणीच्या खात्यामध्ये संक्रांतच्या पूर्वी रक्कम टाकू नका, असे पत्र निवडणूक आयोगाला काँग्रेसने देऊन महिलांच्या महत्त्वाच्या सणाला विरोध केला आहे तसेच उबाठा सेनेचा सुद्धा याला विरोध आहे. याचा जाहीर निषेध करण्यासाठी भाजपाच्या वतीने अकोला शहरांमध्ये ८० ठिकाणी मातृशक्तीला सोबत घेऊन या प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्याचा निर्णय भाजपाने घेतला आहे. ११ जानेवारी ५ वाजता शहरात ठिकठिकाणी निषेध करण्यात येईल.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये हिंदू सणातील महत्त्वाचा मकर संक्रांत हा उत्सव देशभरात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो आणि हळदीकुंकू आणि संस्कृतीचा संवर्धनाचं काम असणारा या कार्यक्रमाला महिलांच्या खात्यामध्ये दोन महिन्याची रक्कम देण्याचा निर्णय निवडणूक घोषणा होण्याच्या आधी झाली होती आणि त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते. त्या नियोजनाला विरोध करण्याचा निर्णय पत्र काँग्रेसच्या वतीने देण्यात आले आहे. याचा जाहीर निषेध अकोला नगरातील ८० ठिकाणी मातृशक्तीला सोबत घेऊन भारतीय जनता पक्षाने जाहीर निषेध ११ जानेवारी रोजी ठीक पाच वाजता वेगवेगळ्या ठिकाणी करून लाडक्या बहिणीच्या हक्काला विरोध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्यात येणार आहे


## अपघातात शेतकरी पुत्र जागीच ठार.....

**नातेवाईकांची हिवरखेड पोलिस स्टेशनला धाव**



प्रतिनिधी ११ जानेवारी

**प्रतिनिधी हिवरखेड:** तेल्हारा मार्गावरील गोरधा फाट्या जवळ कारने हिंगणी येथील शेतकरी पुत्र मोटारसायलने जात असता त्याला जबर धडक दिली. या घटनेत युवक जागीच ठार झाला. मृतक अश्विन कोरडे हिंगणी येथील असल्याची माहिती आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी कार ताब्यात घेतली. अपघातात युवक मरण पावल्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. आरोपी चालकाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली. तसेच या भागातील वाढत्या अपघातांना आळा घालण्याची मागणी केली. पोलिसांनी पंचनामा केला. हिवरखेड पोलिस तपास करीत आहेत.




## राज्याच्या महावितरण विभागात 100 कोटींचा घोटाळा!

**भावेशकुमार, हितेशभाई, हिरेनकुमारविरोधात गुन्हा दाखल**

प्रतिनिधी ११ जानेवारी

**मुंबई :** राज्याच्या महावितरण विभागात १०० कोटींचा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून हा घोटाळा झाल्याचे उघड झालं आहे. २०२४ ते २०२६ दरम्यान ओम एस सीजेआर लामाट व्हिया प्रोजेक्ट कंपनीने महावितरणची १०० कोटींची फसवणूक केली. कंपनीच्या संचालकांवर निर्मलनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी कंपनीचे संचालक भावेशकुमार पटेल, हिरेनकुमार कनानी आणि हितेशभाई राविया यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखकडे वर्ग होण्याची शक्यता आहे. तक्रारीनुसार, २०२४ ते जानेवारी २०२६ दरम्यान मे. ओम यश सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक भावेशकुमार अश्विनभाई पटेल, हितेशभाई आणि हिरेनकुमार लावजीभाई कनानी यांनी संगनमताने ९९ कोटी ५० लाख रुपयांची बनावट बँक गॅरंटी तयार केल्याचा आरोप आहे.

आरोपींनी स्टेट बँक ऑफ इंडिया, जुनागड शाखा (गुजरात) यांच्या नावाची बनावट बँक गॅरंटी तयार करून त्यावर एसबीआयचा बनावट ई-मेल वापरल्याचे तपासात समोर आले आहे. ही बनावट बँक गॅरंटी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण), मुंबई येथील नवीकरणीय ऊर्जा विभागाकडे सादर करण्यात आली.

## विकास कामांच्या पूर्ततेसाठी भाजपला कौल द्या : चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिकेची निवडणूक विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्त्वाची आहे. या दृष्टीने भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस युतीला कौल द्या असे आवाहन महसूल मंत्री तथा भाजपचे राज्य निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी केले.



ही निवडणूक केंद्र शासनाच्या ५५, राज्य शासनाच्या ४८, पालकमंत्री आकाश फुंडकर तसेच आमदार रणधीर सावरकर यांच्या २३ अशा १२६ विकास योजनांच्या अंमलबजावणीची असल्याचे बावनकुळे म्हणाले. या योजनांना गती देण्यासाठी १५ जानेवारीला भाजपच्या उमेदवारांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवाजीनगर व शिवाजी पार्क येथे आयोजित संवाद सभांना संबोधित करताना ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळातील अकोला विकास आराखडा तयार केला आहे. त्यांचा २०४७ पर्यंत विकसित अकोल्याचा संकल्प आहे. हा संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी अकोलेकरांची असून १५ जानेवारीला भाजपला मत दिल्यानंतर या दिशेने निर्णायक पाऊल टाकले जाईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. रस्ते, वीज आणि पाणी यासारख्या मूलभूत समस्या कायमस्वरूपी सोडवताना, टॉवर चौक ते उमरी रस्त्याचे चौपदरीकरण, अकोट फैल भागातील रेल्वे उड्डाणपूल, असदगड किल्ल्याचा विकास, ई-सिटी बस, भूमिगत गटार योजना, तसेच पोलिस आयुक्तालयाचा प्रस्ताव मंजुरीच्या टप्प्यात असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. विधानसभेचे मुख्य प्रतोद रणधीर सावरकर हे योग्य मार्गदर्शक आहेत. युवा खासदार अनुप धोत्रे पंतप्रधान नरेंद्र मोर्दीचे विश्वासू सहकारी आहेत. त्यामुळे अकोल्यातून ६० नगरसेवक निवडून द्या, विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस काहीही कमी पडू देणार नाहीत, अशी ग्वाही बावनकुळे यांनी दिली. सुरूवातीला आमदार रणधीर सावरकर, खासदार राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, विजय अग्रवाल यांनी बावनकुळे यांचे स्वागत केले. राजराजेश्वराची प्रतिमा त्यांना भेट दिली. अकोल्यात आल्यावर लालाजींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सभेपूर्वीच फोन करून अकोला महानगरपालिकेत भाजपचाच महापौर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.



सिटी न्यूज वऱ्हाड
रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मेळघाट आरोग्य परिक्रमेत डॉक्टरांनी सक्रीय सहभाग नोंदवावा

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अमरावती:** मेळघाटातील महिला व बालकांच्या आरोग्यासाठी मेळघाट परिक्रमा हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महिन्यातील एक दिवस या भागात विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी खासगी डॉक्टरांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात वॉर रूम बैठकीत सामाजिक आणि आरोग्यविषयक आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्यासह शहरातील वैद्यकीय व्यावसायिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी मेळघाटातील आरोग्यविषयक प्रश्नांची माहिती दिली. याठिकाणी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे माता व बाल मृत्यू नियंत्रणात आहे. मात्र यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महिला व बालकांच्या आरोग्यासाठी नियमित तपासणी करण्यात येणार आहे. प्रामुख्याने महिला व बालरोग तज्ज्ञ शासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येतील. यात त्यांच्या आरोग्याची तपासणी होऊन त्यांच्या आजाराचे निदान होऊ शकेल. त्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्या कमी होतील. आरोग्याच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच महिला आणि बालकांना पौष्टिक अन्न मिळावे, यासाठी डॉ. आशिष सातव यांनी सूचविलेल्या उपायांवर कृषि विज्ञान केंद्राकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी एकात्मिक बाल विकास विभागाचे सहकार्य करण्यात येणार आहे.

यासोबतच ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या किडणीची तपासणी करण्यात येणार आहे. प्रामुख्याने किडणीचे आजार आढळणाऱ्या भागावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यातील निर्माण होणाऱ्या समस्या कमी होण्यास मदत होईल. रक्तसंसर्गासाठी उपाययोजना करण्यात येणार असून कुपोषण निवारणासाठी ग्राम समितीची महिन्यातून एकदा सभा घेण्यात येणार आहे. मेळघाटातील आरोग्य सुधारावे, यासाठी जीवनसत्वयुक्त आहाराचा समावेश करण्यावर भर देण्यात येणार आहे. आरोग्यासह नागरिकांचे जीवनमान सुधारण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी दुध उत्पादन वाढवून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. यासाठी दोन शितवाहन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोहफुलांमधून उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार आहे.

# दादागिरी, गुंडागिरी, दहशत गिरी खपून घेतली जाणार नाही

## अजित पवारांची प्रतिपादन, अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसचा विश्वास मेळावा; आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके यांची उपस्थिती

प्रतिनिधी ११ जानेवारी




**अमरावती :** 'ज्या गावच्या बोरी असतात, त्या गावात बाभळी असतात' त्यामुळे असं कोणी वेगळे समजण्याचे कारण नाही. समाजात एकोपा असावा, ही आपली परंपरा आहे. चांगले काही उभे करायला वेळ लागतो. मात्र, विध्वंस, राखरांगोळी करायला वेळ लागत नाही. तेव्हा जातीय तेढ अथवा समाजात भांडण लावण्याची कृती करीत असेल तर अशा प्रकारची दादागिरी, गुंडगिरी आणि दहशतगिरी मोडून काढणार, असा थेट इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे शुक्रवारी दिला; परंतु हा इशारा कोणाला दिला, हे मात्र गुलदस्त्यात आहे.

येथील गाडगेनगरस्थित संत गाडगेबाबा समाधी प्रांगणात अमरावती महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी (अजित पवार) उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित विश्वास मेळाव्यात ते मार्गदर्शन करताना बोलत होते. पवार पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य उभे केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने मताचा अधिकार दिला. म्हणूनच शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांनी आपण पुढे गेले पाहिजे. सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करताना शहरांचा विकास करण्याची जबाबदारी आमची आहे. मी कामाचा माणूस आहे. मला विकास करायला आवडतो. शहरात जातीय सलोखा असला पाहिजे. काही लोक स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी जातीजातीत वाद लावतात. याचा फटका गरिबांना बसतो. अमरावतीत जातीय सलोखा राहिला पाहिजे. कुणी भडकविण्यास आले तर भडकू नका. डोकी शांत ठेवा. कारण नागरिकांना सोबत घेऊन आम्हाला पुढे जायचे आहे. त्याकरिता आम्हाला साथ हवी आहे, असे आवाहन अजित पवार यांनी केले.

यावेळी मंचावर आ. संजय खोडके, आ. सुलभा खोडके, प्रवक्ते सूरज चव्हाण, माजी आमदार देवेंद्र भुयार, यश खोडके, वसंत घुईखेडकर, सुरेखा ठाकरे, ॲड. किशोर शेळके, प्रशांत डवरे, संतोष महात्मे, अविनाश मार्डीकर, शेख जाफर, डॉ. सुभाष गवई, मधू करवा, दीपक लोखंडे, स्वाती जावरे, रमेश ढवळे, अशोक अग्रवाल, अख्तर हुसेन, पी. टी. गावंडे, अरविंद गावंडे, आश्विन चौधरी, सुरेश भारंबे, अमृत मुथा, महेंद्र भुतडा, प्रताप देशमुख, ॲड. शोएब खान, मनोज देशमुख, अब्दुल खालीद, गजानन चहाटे, जितेंद्रसिंह ठाकूर, प्रकाश वैद्य, योगिता गिरासे, ॲड. छाया मिश्रा आदी उपस्थित होते.

### दादा अधिकाऱ्यांना सांगा 'ॲक्शन' घ्या

अमरावतीत सामाजिक सलोखा आहे. सर्वधर्मीय गुण्यागोंविदाने राहतात. मात्र, काही लोक विषारी भाषा बोलतात. माजी खासदार दोन समाजात तेढ निर्माण करण्याची भाषा करतात. समाजात वाद होतील, असे वक्तव्य केले जाते. त्यामुळे दादा अधिकाऱ्यांना सांगा ॲक्शन घ्या, असे प्रास्ताविकातून आ. सुलभा खोडके यांनी ना. अजित पवार यांच्याकडे ही मागणी आवर्जून केली.

### विभागाचे ठिकाण; पण अमरावतीचा विकास नाही

राज्यात सात ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत. मात्र मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकच्या तुलनेत अमरावती हे विभागीय केंद्र असताना फारसा विकास झाला नाही. विमानतळ, उद्योगधंदे, रोजगार, आयटी हब, रस्ते, पूल आदी विकास झाला नाही. त्यामुळे आमदार सुलभा खोडके यांनी सुचविलेल्या प्रस्तावानुसार येत्या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली जाईल, असे ना. अजित पवार म्हणाले. रेल्वे उड्डाणपूल निर्मितीच्या १२५ कोटींच्या प्रस्तावाला बजेटमध्ये तरतूद केली जाईल.

# भाजप आणि युवा स्वाभिमानची युती तुटली ?

## पालकमंत्र्यांचा मास्टर स्ट्रोक; अमरावतीच्या राजकारणात खळबळ, रवी राणांना झटका

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अमरावती :** अमरावती महापालिका निवडणुकीत भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष यांच्यात युती असली तरी युती धर्माचे पालन होत नाही, असे गत काही दिवसांपासून चित्र आहे.

शनिवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे 'इन ॲक्शन' झाल्याचे दिसून आले. चंपराशीपुरा येथील जाहीर सभेत ज्या जागा भाजपने युतीत युवा स्वाभिमान पक्षाला सोडल्यात, त्या जागांवर भाजपचेच पण बंडखोर म्हणून अपक्ष असलेल्या सहा उमेदवारांना जाहीर समर्थन केले.

यात एसआरपीएफ वडाळी येथे दोन उमेदवार आणि गडगडेश्वर, बडनेरा जुनी वस्ती व सूत गिरणी सामरानगर या प्रभागांत प्रत्येकी एक, अशा एकूण सहा अपक्ष उमेदवारांना भाजपचे जाहीर समर्थन दिले आहे. एकंदरीत घडामोडी बघता, भाजप आणि युवा स्वाभिमान यांच्यात युती तुटल्यागत जमा झाली आहे. भाषणात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे नाव घेणेही टाळले, अशी विश्वसनीय माहिती आहे.

शनिवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे येथील चपराशीपुरा शुक्रवारी बाजारात जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी आले असता, त्यांनी अपक्ष उमेदवारांना भाजपचे समर्थन असल्याचे जाहीर केले. प्रभाग क्रमांक १९ साईनगर अकोली येथे भाजपचे तुषार भारतीय आणि मोरबाग विलासनगर येथे राजेश पड्डा यांच्याविरोधात युवा स्वाभिमान पक्षाने अनुक्रमे सचिन भेंडे, दीपक साहू (सम्राट) यांना उमेदवारी दिली आहे. एवढेच नव्हे, तर भाजप नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा यांनी या दोन्ही प्रभागांत भाजप अधिकृत उमेदवारांच्या विरोधात प्रचार सुरू केला. त्यामुळे ही बाब भाजपच्या वरिष्ठांचा यावेळी मंचावर खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार उमेश यावलकर, आमदार केवळराम काळे, माजी आमदार विजयराज शिंदे, माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील, शहराध्यक्ष नितीन धांडे, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, किरण पातूरकर, निवेदिता दिघडे, सिद्धार्थ वानखडे, संध्याताई टिकले आदी उपस्थित होते. भाजपने प्रभाग क्रमांक ए वडाळी एसआरपीएफमध्ये 'अ' जागेवर अनिल सोनटक्के, 'क' जागेवर गौरी सरबेरे या अपक्ष उमेदवारांना समर्थन जाहीर केले आहे. तसेच प्रभाग क्रमांक १७ गडगडेश्वरमधून 'अ' जागेचर संतोष पिढेकर, प्रभाग क्रमांक २१ बडनेरा जुनी वस्ती योगेश निमकर, प्रभाग क्रमांक २० सूत गिरणी सामरानगरमध्ये युवा स्वाभिमान पक्षाला महिला सर्वसाधारण जागा सोडण्यात आली असून, या जागेवर कोणत्या उमेदवाराला समर्थन द्यायचे याबाबत निर्णय झालेला नाही, अशी माहिती आहे. प्रभाग क्रमांक १८ राजापेठ येथे सुद्धा एका अपक्ष उमेदवाराला समर्थन दिले आहे.

> भाजपचे तीन ठिकाणी उमेदवार 'विड्रॉल' झाले आहे. त्यामुळे स्थानिक भाजप नेत्यांनी त्या भागात अपक्ष उमेदवार मजबूत आहे, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगितले असावे, असे असले तरी ज्या ठिकाणी भाजपचे उमेदवार नाही, तेथे युवा स्वाभिमानचे उमेदवार आहेत. भाजप आणि वायएसपी यांच्यात छुपी युती आहे.
>
> **रवी राणा,** आमदार तथा युवा स्वाभिमान पक्ष सर्वेसर्वा

> भाजप आणि आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानची महापालिका निवडणुकीत युती झाली होती. मात्र, आता मतदानाला पाच दिवस शिल्लक असताना ही युती तोडण्यात आली आहे. त्यामुळे भाजपने ज्या सहा जागा राणा यांच्या युवा स्वाभिमानला दिल्या होत्या, त्या सहाही जागांवर भाजपने अपक्षांना समर्थन दिले.
>
> **डॉ. नितीन धांडे,** शहराध्यक्ष, भाजप

# महापालिका निवडणुकीची यंत्रणा सज्ज; अमरावतीत ईव्हीएम सीलिंग प्रक्रियेला गती

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अमरावती :** आगामी अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक यंत्रणा पूर्णतः कार्यान्वित झाली असून मतदान प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा असलेल्या ईव्हीएम सीलिंग प्रक्रियेला वेग आला आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि काटेकोर पद्धतीने राबविण्यात येत आहे.

शहरातील नियुक्त सुरक्षा कक्षामध्ये ईव्हीएम मशीनमधील बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिटची सीलिंग प्रक्रिया अधिकृत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडत आहे. या प्रक्रियेदरम्यान कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रत्येक टप्प्यावर विशेष दक्षता घेण्यात येत आहे.

ईव्हीएम सीलिंगच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली. त्यांनी संपूर्ण प्रक्रिया नियमांनुसार होत असल्याची खात्री करून घेतली तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेमध्ये विश्वास निर्माण होण्यासाठी पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. सुरक्षा कक्षामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, २४ तास पोलीस बंदोबस्त आणि प्रवेश नियंत्रण व्यवस्था लागू करण्यात आली असून ईव्हीएम मशीनच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा ठाम संदेश प्रशासनाने दिला आहे. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आवश्यक असलेली सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून, मतदान प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि विश्वासार्ह वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे चित्र आहे.

# अकोला शहराची संस्कृती टिकवण्यासाठी भाजपला मत द्या : आमदार रणधीर सावरकर

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अकोला :** हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व विचारसरणीचा भाजपने कायम पुरस्कार केला आहे. संस्कृती रक्षणासाठी प्राधान्य देणा-या भाजप उमेदवारांना विजयी करा तसेच संस्कृती नष्ट करण्याचे काम काँग्रेस उबाठा सेना, एमआयएम करत आहे. यापासून सावध रहा असे आवाहन आमदार रणधीर सावरकर यांनी केले.

अकोल्यात राजेश्वर मंदिराचा विकास करण्याचा संकल्प केला असून शहरातील प्रत्येक क्षेत्रामध्ये सभामंडपाच्या माध्यमातून विकास कामे होत आहेत. मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा देऊन उज्जैन महाकालेश्वर मंदिर पासून ओंकारेश्वर जाण्यासाठी रेल्वेचे काम सुरू झाले आहे. तसेच अकोला शहरातील पालखी सोहळा हा मोठ्या प्रमाणात चांगला झाला पाहिजे त्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम भारतीय जनता पक्षांनी केला असल्याचे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. आमदार रणधीर सावरकर यांनी प्रभाग १०, १२, १३, १७, १८, २० भागात मतदारांशी संवाद साधला. तेव्हा ते बोलत होते. हिंदुत्वाला पराभूत करणारे वेगवेगळे मुखवटे घेऊन उभे आहेत त्यापासून सावध राहा असे आवाहन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. हिंदुत्व मताचा विभाजन करण्याचा अकोला पश्चिम विधानसभेचा पॅटर्न या महानगरपालिकेमध्ये करण्याचा प्रयत्न किती करत असले तरी राज राजेश्वर नगरीतील नागरिक हे खंबीरपणे भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी उभे राहून षडयंत्र यशस्वी होऊ देणार नाही असाही विश्वास विजय अग्रवाल यांनी व्यक्त केला.

# सुरज मिश्रा यांच्या प्रचारार्थ आ. रवि राणा यांच्या जाहीर सभेत महिलांची प्रचंड गर्दी; प्रभाग १३ मध्ये उसळला जनसमुदाय

प्रतिनिधी ११ जानेवारी




**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १३ मधील युवा स्वाभिमान पार्टीचे अधिकृत उमेदवार सुरज मिश्रा यांच्या प्रचारार्थ अमरावती येथील ओसवाल भवन येथे आयोजित भव्य जाहीर सभेत महिलांची प्रचंड गर्दी उसळली.आमदार रवि राणा यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सभेला 'लाडक्या बहिणी'चा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून संपूर्ण सभागृह नागरिकांच्या जनसमुदायाने फुलून गेले होते.

या सभेत बोलताना आ. रवि राणा यांनी महिलांना उद्देशून भावनिक आणि प्रभावी भाषण केले. ते म्हणाले, सुरज मिश्रा यांच्या रूपाने प्रभाग क्रमांक १३ मधील जनतेला नेता नव्हे, तर एक सच्चा, प्रामाणिक आणि सेवाभावी बेटा निवडण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. जनतेच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहणारा, सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा उमेदवार म्हणजेच सुरज मिश्रा आहेत.

आ. राणा यांनी पुढे सांगितले की, युवा स्वाभिमान पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी, विकासाभिमुख आणि जनतेच्या विश्वासावर उभी असलेली चळवळ आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत पाना चिन्हासमोरील बटन दाबून सुरज मिश्रा यांना विजयी करण्याचा संकल्प महिलांनी एकमुखाने केला.

सभेदरम्यान 'लाडक्या बहिणी'नी युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यपद्धतीवर आणि नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी या पक्षालाच संधी देण्याचा निर्धार केला. महिलांचा वाढता सहभाग आणि उत्साह पाहता प्रभाग क्रमांक १३ मध्ये युवा स्वाभिमान पार्टीच्या विजयाचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र या सभेत स्पष्टपणे दिसून आले. या जाहीर सभेला ह.भ.प. सागर देशमुख महाराज, सुनील राणा, जयंतराव वानखडे, डॉ. अजय गाडे, संजय मुनोत, गणेशदास गायकवाड, कमलकिशोर मालाणी, विनोद नावंदर, अमृतजी मोथा, मनीष दुबे, शांती सारडा, कैलाश जोशी, हितेश पटवार, गिरजा शंकर यादव, संजय कपले, सुभाष गायकवाड (रिपाई), लक्ष्मीकांत यादव, देवराज तिवारी, मुकेश तिवारी, रमेश मारोडकर, दुबे ताई यांच्यासह शेकडो नागरिक, महिला कार्यकर्त्या व पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांच्या प्रचंड सहभागामुळे आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे सुरज मिश्रा यांच्या प्रचाराला नवचैतन्य मिळाले असून, प्रभाग क्रमांक १३ मध्ये परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचे स्पष्टपणे जाणवत होते.

# उषाताई विरक यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन

प्रतिनिधी ११ जानेवारी




**अकोला :** महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १२ मधील शिवसेना शिंदे पक्षाच्या विकासाची दृष्टी तसेच धडाडीने विकास करण्यासाठी प्रसिद्ध अशा उषाताई विरक यांच्या खोलेश्वर मधील प्रचार कार्यालयाचे उदघाटन रविवारी सकाळी झाले. उषाताई विरक यांना या प्रभागात पुन्हा एकदा निवडून देऊन विकासाला चालना द्यावी असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. माजी आमदार गोपीकिसन बाजोरिया, नारायणराव गव्हाणकर, चंद्रशेखर पांडे गुरूजी, विजय जानी, गुजराती समाजाचे अध्यक्ष हिमेश शाह, महेश बगरेट तसेच प्रभागातील मान्यवर उपस्थित होते. प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव पुढाकार घेतला. याची मतदारांना देखील जाणीव असून यावेळी देखील ते आपल्याला साथ देतील असा विश्वास उषाताई विरक यांनी व्यक्त केला. शिवसेना शिंदे पक्षाची शक्ती आपल्या पाठीशी आहे. तसेच पक्ष कार्यकर्ते आपल्या विजयासाठी झटत आहेत असे उषाताई विरक म्हणाल्या. उपस्थित मान्यवरांनी उषाताई विरक यांना प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी निवडून द्या असे आवाहन केले.

# 'शिवसेना (उबाठा)' चा प्रभाग 20 मध्ये दरारा

## उमेदवारांच्या प्रचाराचा धडाका; विकासाचा 'वचननामा' जाहीर

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अकोला:** महापालिकेच्या प्रभाग २० मध्ये उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना महाविकास आघाडीच्या पॅनेलने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. '८० टक्के समाजकारण आणि २०टक्के राजकारण' हे ब्रीदवाक्य घेऊन या प्रभागातील चारही अधिकृत उमेदवार जनसंपर्कासाठी मैदानात उतरले आहेत. मोठा जनसमुदाय या चार ही उमदेवारांच्या मागे असून याचा विजय सुनिश्चित मानला जात आहे. प्रभाग वीस मध्ये सर्वात मोठी रॅली ही शिवसेनेची निघत आहे.प्रभाग वीस मध्ये सर्वाधिक प्रतिसाद हा शिवसेना उमेदवारांना मिळत असून उमेदवारांनी मतदारांशी संवाद साधताना प्रभागाच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. शिवसेना उमेदवारांनी प्रभागातील जनतेला तोंडी आश्वासन दिले नाही त्यांनी जाहिरनामा प्रकाशित करत वाढीव मालमत्ता कर कमी करून स्थानिकांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले आहे. घरगुती नळाची पाणीपट्टी कमी करणे, नियमित पाणीपुरवठा आणि सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे. नवीन रस्ते बांधणी, प्रभागाचे सुशोभीकरण आणि हायमास्ट दिवे बसवणे. आधुनिक आरोग्य केंद्रांची निर्मिती आणि अंगणवाडी शाळांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे.महिलांच्या सुरक्षिततेसाठी मुख्य चौकांमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहे. या प्रभागात 'मशाल' या चिन्हावर विजय रामदास इंगळे, सुरेखाताई मंगेश काळे, वर्षाताई राजेश घोगरे, शंकर भाऊराव लंगोटे हे चौघे एकत्रित निवडणूक लढवित आहे. 'येत्या गुरुवारी, १५ जानेवारी रोजी सकाळी ७:३० ते ५:३० या वेळेत जास्तीत जास्त संख्येने मतदान करून आपल्या हक्काच्या उमेदवारांना 'मशाल' या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे,' असे आवाहन शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ११ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जम्मा गायक सुशील बजाज यांचा जम्मा जागरण भक्तीभावात संपन्न

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने स्थानिक गीता नगर परिसरातील रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात नुकताच रामदेवबाबा यांच्या जीवन कार्यावर आयोजित संगीतमय जम्मा जागरण भक्तीभावात संपन्न झाला. रामदेवबाबा यांच्या या भव्य जम्मा जागरण व भजन संध्येत हैदराबादचे आंतरराष्ट्रीय जम्मा व भजन गायक सुशील गोपाल बजाज उपस्थित होते. या उत्सवात जम्मा गायक बजाज यांनी रामदेवबाबा यांच्या अवतार कार्यावर भव्य संगीतमय जम्मा जागरण सादर करून परिसरात भक्तीभाव निर्माण केला. उत्सवात बाबांची दैवी ज्योत दर्शन साकार करण्यात आली होती. त्याचप्रमाणे बाबांची दैवी झांकी श्रृंगार करून विद्युत सजावट व अलंकरण मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते.

## अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शाळांमधून मतदार जनजागृती

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अकोला:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

१० जानेवारी रोजी या उपक्रमांतर्गत माँ शारदा देवी कॉन्व्हेंट, गीता नगर, मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक २२, कृषी नगर तसेच न्यू इंग्लिश हायस्कूल, अकोला येथे इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

एल. आर. टी. कॉलेजचे माजी प्राचार्य सत्यनारायण बाहेती यांच्या पुढाकाराने माँ शारदा देवी कॉन्व्हेंट येथे मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. यावेळी शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर, सत्यनारायण बाहेती, संजय खराटे व सुशीला सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका तसेच मतदान प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक २२ येथे लोककलेच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात सेवानिवृत्त मुख्याध्यापक सर्जेराव देशमुख यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तसेच न्यू इंग्लिश हायस्कूल येथे विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती विषयावर विविध फलक तयार करून प्रभावी नाटिकेचे सादरीकरण केले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक माधव मुंशी, बांगर, सौ. डबाले, सौ. अलका मुंडे, मनपा शाळा क्रमांक ७ चे मुख्याध्यापक शैलेश शिरसाट तसेच शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबातील १८ वर्षांवरील मतदारांचे नाव मतदार यादीत आहे का याची खात्री करण्यास, तसेच वृद्ध व दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

## पायाला भिंगरी लावल्यागत प्रभाग ३ मध्ये उमेदवारांचा प्रचार

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अकोला:** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्षाला मत द्या असे आवाहन प्रभाग ३ मध्ये मतदारांना करण्यात येत आहे. प्रभाग तीनचे भाजप उमेदवार सागर शेगोकार, प्रशांत जोशी, नीतू जगताप, शशिकला काळे आणि कार्यकर्ते पायाला भिंगरी लावल्यागत प्रचार करीत आहेत.

सकाळी ९.३० वाजता सुरू झालेला प्रचार रात्री उशिरापर्यंत सुरू असतो. शनिवारी बिर्ला कॉलनी, प्रसाद कॉलनी, जठारपेठ भागात प्रचार करण्यात आला. तर रविवारी सकाळ पासून दुबेवाडी भागात प्रचारास आरंभ झाला.

चारही उमेदवारांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात येत आहे. प्रचारा दरम्यान भारतीय जनता पक्षाचे विकासाचे संकल्प पत्र मतदारां पर्यंत पोहचवले जात आहे. भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून विकासाची गंगा प्रवाहित करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन केले जात आहे. मतदारांकडून ठिकठिकाणी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी अकोला पूर्व मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हद्दवाढ भागासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. झालेल्या विकासाची जाणीव मतदारांना देखील आहे. प्रभाग ३ मध्ये उमेदवारांसह कार्यकर्ते देखील उत्स्फूर्त प्रचार करीत आहेत. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत ते प्रचारात मग्न असतात. येत्या गुरुवारी मतदान आहे. येत्या काही दिवसांत अधिकाधिक मतदारांशी संपर्क साधण्याचा उमेदवारांचा प्रयत्न आहे.

## प्रभाग १७ ब मध्ये अपक्ष अब्दुल राजिक अब्दुल रऊफ यांचा प्रभाव

◆ समाजातील प्रत्येक घटकांचा जोरदार पाठिंबा



प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला:** प्रभाग क्रमांक १७ ब हरिहरपेठ आणि लगतच्या भागाशी जोडलेला आहे. या प्रभागात तरूण तडफदार तसेच प्रभागाचा कायापालट करण्याची जिद्द बाळगून असलेले अपक्ष उमेदवार अब्दुल राजिक अब्दुल रऊफ निवडणूक लढवित आहेत. प्रभागात त्यांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे विरोधकांना चांगली टक्कर दिली जात आहे.

अब्दुल राजिक यांचे व्यक्तीमत्व समोरच्या वर छाप टाकणारे आहे. तसेच प्रभागात प्रचारासाठी बाहेर पडतात तेव्हा विविध स्तरातील समर्थक त्यांच्या सोबत असतात. मोठ्यांचे आशीर्वाद घेत त्यांची पदयात्रा प्रभागात फिरते त्यावेळी उल्हासाचे वातावरण निर्माण झालेले असते. यावेळी आपण कायापालट घडवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समाजातील विविध घटकांचा त्यांना पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या पदयात्रेत लहानापासून मोठ्या पर्यंत प्रचंड उत्साह दिसून येतो.

## अकोला महानगरपालिका निवडणूक २०२६

## प्रभाग क्र. २० मध्ये भाजप-राष्ट्रवादी युतीचा 'वचननामा' जाहीर

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. २० मधील भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे अधिकृत उमेदवार भाजपाचे मंगेश भगवान झिने, सौ. शारदा वैकुंठ ढोरे, सौ. सोनाली गणेश अंधारे आणि विनोद मुरलीधर मापारी यांनी आपला वचननामा प्रसिद्ध केला आहे.भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून आतापर्यंत प्रभागात ७० कोटी रुपयांहून अधिक निधीची विकासकामे पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रभागातील विविध भागात लहान मुलांसाठी उद्याने, खेळाची मैदाने, सर्व वयोगटांसाठी ओपन जिम आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका केंद्र उभारण्याचे वचन देण्यात आले आहे. महिलांसाठी स्त्री सक्षमीकरण केंद्र आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्यावर भर दिला जाणार आहे. प्रभाग क्र. २० हा क्षेत्रफळाने मोठा असून यामध्ये खडकी, शिवापूर, रिंग रोडचा पूर्ण भाग, गौरक्षण रोड आणि आरटीओ रोडचा काही भाग समाविष्ट आहे.

## 'आपला सेवक' विनोद मापारी यांचा संघर्षातून यशापर्यंतचा प्रवास !

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला : 'या शहराच्या सगळ्या वाटा मला विचारा,**
**पायात कुणाच्या होता काटा मला विचारा...'**

या ओळी ज्यांना तंतोतंत लागू पडतात, असे अकोल्यातील जनसामान्यांचे नेतृत्व म्हणजे विनोद मापारी. अकोला महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रभाग क्र. २० मधील भाजप-राष्ट्रवादी युतीचे उमेदवार विनोद मापारी यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाची सध्या शहरात जोरदार चर्चा आहे.

सायकलवरून ब्रेड विकणारा मुलगा झाला 'उपमहापौर' एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या विनोद मापारी यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. ज्या प्रभागाचे त्यांनी नेतृत्व केले, त्याच प्रभागाच्या गल्लीबोळांत कधी काळी ते सायकलने दारोदार फिरून ब्रेड विकण्याचे काम करायचे. समाजसेवेची ओढ असल्याने १९९७ मध्ये त्यांनी



'युवाशक्ती विकास मंच' स्थापन केला आणि प्रशासकीय त्रुटींविरुद्ध आंदोलने करत जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली.व्यवसाय आणि शिक्षणातही भरारी राजकारणाला केवळ सेवेचे माध्यम मानणाऱ्या मापारी यांनी 'बिफोर यू कॉम्प्युटर' नावाने दोन संस्था उभारल्या, सेतू केंद्र चालवले आणि कौलखेड परिसरात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय सुद्धा सुरू केले. व्यवसायात यशस्वी होऊनही त्यांची नाळ नेहमीच सामान्य माणसाशी जोडलेली राहिली.

राजकीय कारकीर्द आणि विकासकामांचा झंझावात त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत २०१२ मध्ये शिवसेनेने त्यांना उमेदवारी दिली आणि ते पहिल्यांदाच नगरसेवक झाले. त्यांच्या आक्रमक कार्यशैलीमुळे त्यांना अकोला महानगरपालिकेचे उपमहापौर पद भूषवण्याची संधी मिळाली. २०१७ मध्ये भाजपच्या ध्येयधोरणांनी प्रभावित होऊन त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि तत्कालीन ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली विक्रमी मताधिक्याने निवडून आले. त्यांच्या याच अनुभवामुळे त्यांची वर्णी अकोल्याच्या स्थायी समितीच्या सभापती लागली.

'आपला सेवक' - २४ तास उपलब्ध लहान बाळाच्या जन्म दाखल्यापासून ते वैकुंठ रथाच्या सेवेपर्यंत, प्रत्येक सुख-दुःखात धावून जाणारा माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे. सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि 'इकोफ्रेंडली गणेश विसर्जन घाट' यांसारख्या हायटेक उपक्रमांमुळे ते तरुणांमध्येही लोकप्रिय आहेत.पुन्हा एकदा जनतेचा कौल मिळवण्यासाठी सज्ज कितीही मोठी पदे भूषवली तरी पदाचा गर्व न बाळगता 'आपला सेवक' ही ओळख कायम ठेवणारा हा योद्धा आता १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी पुन्हा सज्ज झाला आहे. 'छोट्याशा थांब्यानंतर ही सुरुवात नवी आहे, पुन्हा एकदा तुमची साथ हवी आहे,' या भावनेतून ते मतदारांसमोर जात आहेत. गेल्या निवडणुकीचा मताधिक्याचा विक्रम यंदा अकोलेकर मोडीत काढतील, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे.

## 'वीजबिल वाटपापासून' मंगेश झिने यांचा प्रवास

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** 'फाटका कार्यकर्ताही नेता होऊ शकतो', हे अकोल्याच्या राजकारणात सप्रमाण सिद्ध करणारे नाव म्हणजे मंगेश भगवान झिने. अकोला महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २० मधील भाजप-राष्ट्रवादी युतीचे उमेदवार मंगेश झिने यांची उमेदवारी सध्या संपूर्ण प्रभागात चर्चेचा विषय ठरत आहे. एका सामान्य वीजबिल वाटप करणाऱ्या कार्यकर्त्याचा नगरसेवक उमेदवारी पर्यंतचा प्रवास हा प्रेरणादायी संघर्षाची गाथा आहे.

उदरनिर्वाहासाठी पायपीट ते जनतेची सेवा मंगेश झिने यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केली. प्रभागातील घराघरांत वीजबिल वाटपाची पायपीट करून त्यांनी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे 'तेलमीठ' जमावले. रखरखत्या उन्हात



मैलोन्मैल चालत असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर कधी थकवा दिसला नाही, उलट याच काळात त्यांचा जनसंपर्क वाढत गेला. लोकांच्या घरापर्यंत पोहोचता पोहोचता ते त्यांच्या काळजापर्यंत कधी पोहोचले, हे कोणाला कळलेही नाही.'सबका साथी मंगेश झिने' स्वतः उन्हात चालत असले तरी प्रभागातील प्रत्येक नागरिकावर मायेची सावली धरणारा 'भाऊ' अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे. कोणाचे सुख असो वा दुःख, मंगेश झिने तिथे हजर असतातच. 'सदा दुसऱ्यासाठी ज्याचे जिणे, असा सबका साथी मंगेश झिने', या ओळी त्यांच्या स्वभावाचे यथार्थ वर्णन करतात.राजकीय वाटचाल आणि निष्ठा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून संघटनेत काम करत असताना त्यांच्या निष्ठेची दखल घेत पक्षाने त्यांना प्रभाग क्र. २० मधून उमेदवारी दिली.

## 'स्त्री शक्तीचा' चा जागर; सोनालीताई आणि शारदाताईंच्या कार्याची सर्वत्र चर्चा !

प्रतिनिधी ११ जानेवारी



**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्र. २० मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागात भाजप-राष्ट्रवादी युतीच्या महिला उमेदवार सौ. सोनाली गणेश अंधारे आणि सौ. शारदा वैकुंठ ढोरे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने मतदारांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. एकीकडे शिक्षिका म्हणून संवेदनशील मनाचा वारसा, तर दुसरीकडे जनसामान्यांच्या समस्या सोडवण्याचा धडाका यामुळे या दोन्ही महिला उमेदवारांचे पारडे जड मानले जात आहे.

समाजकारणाचा वारसा जपणारी 'सावित्रीची लेक' सौ. सोनालीताई अंधारे या स्वतः एक संवेदनशील शिक्षिका आहेत. घरातूनच लाभलेला समाजकारणाचा वारसा आणि पती गणेशभाऊ अंधारे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याची भक्कम साथ ही त्यांची जमेची बाजू आहे. जिजाऊ आणि सावित्रीबाई फुलेंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्या महिलांच्या अडीअडचणीत नेहमीच खंबीरपणे उभ्या राहतात. महिलांचे सक्षमीकरण आणि विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हा त्यांचा मुख्य संकल्प आहे.

समस्या कोणतीही असो, तोडगा एकच! प्रभागातील प्रत्येक नागरी समस्येवर तत्परतेने उत्तर देणाऱ्या उमेदवार म्हणून सौ. शारदाताई ढोरे यांची ओळख आहे. प्रभागातील साफसफाई असो वा घंटागाडीची नियमित सेवा, त्या स्वतः जातीने लक्ष घालतात. 'स्ट्रीट लाईट बंद असो की पाण्याचा व्हॉल्व्ह गळत असो, शारदाताईंना एक कॉल केला की प्रॉब्लेम सॉल्व्ह होतो,' असा विश्वास प्रभागातील नागरिक व्यक्त करत आहेत. गेल्या पाच वर्षांत त्यांनी दाखवलेली हीच तत्परता त्यांची सर्वात मोठी ताकद ठरली आहे. या दोन्ही महिला उमेदवारांनी आपल्या वचननाम्यात महिलांसाठी स्वतंत्र सक्षमीकरण केंद्र, लहान मुलांसाठी उद्याने आणि आरोग्याच्या उत्तम सुविधा पुरवण्याचे आश्वासन दिले आहे. 'पुन्हा एकदा विकासाचे वाहू द्या वारे, पुन्हा एकदा नाव शारदाताई ढोरे आणि सोनालीताई अंधारे,' अशा घोषणांनी सध्या प्रभाग क्र. २० दुमदुमून गेला आहे.

## निधन वार्ता

### संध्या ताकवाले



**अकोला:** येथील हरिहरपेठ मधील रहिवासी संध्या सुनील ताकवाले यांचे ९ रोजी निधन झाले. शनिवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

### सौ. नलिनी देशमुख



**अमरावती :** मांगीलाल प्लॉट येथील रहिवासी अँड. प्रशांत वि. देशमुख यांच्या मातोश्री सौ. नलिनी विजय देशमुख (७७) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पती, मुलगा प्रशांत सुन एक विवाहित मुलगी जावई नातवंड असा बराच मोठा परिवार आहे.

## महात्मा गांधी महाविद्यालयात पत्रकारांचा सत्कार



प्रतिनिधी ११ जानेवारी

**कुटासा:** पत्रकार दिनी महात्मा गांधी महाविद्यालय व एच एस व्हि सी गांधीग्रामचे प्राचार्य प्रफुल्ल डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष म्हणून महात्मा गांधी मेमोरियल ट्रस्टचे सचिव, माजी प्राचार्य विलास झामरे, संस्थेचे उपाध्यक्ष संजय इंगळे, सहसचिव डॉ. शरद काठोळे,कोषाध्यक्ष ऋषिकेश अढाऊ उपस्थित होते. महात्मा गांधींच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पत्रकार विनोद वसू यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते शरद वाघोलीकर, संजय माजरे, पद्माकर लांडे, विनोद वसु, कुशल भगत, संजय इंगळे, सुनील बांगर, रवी वानखडे, हर्षल कोल्हे यांचा शाल, श्रीफळ व बुके देऊन सत्कार करण्यात आला. आदर्श पत्रकारितेवर विनोद वसु आणि विलास झामरे यांनी प्रकाश टाकला. प्रास्ताविक प्राचार्य प्रफुल्ल डोंगरे यांनी, सूत्रसंचालन प्रा. मोक्षदा इंगोले यांनी तर आभार प्रदर्शन देवश्री हिरुडकर यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. जगन्नाथ बरडे, प्रा. डॉ विजय चव्हाण, प्रा. अतुल फोकमारे, सरिता गौर, ममता खूमकर, नारायण बावणे उपस्थित होते.


## गजानन महाराज मंदिर प्रांगणात गजानन विजय ग्रंथाचे पारायण



प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला:** न्यू तापडिया नगरातील श्री गजानन महाराज मंदिरातील प्रांगणात पौष रविवार निमित्त श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले. सकाळी ८.३० वाजता पारायणाला आरंभ झाला. महिला मोठ्या संख्येने सहभागी होत्या. छायाताई तांदुळकर यांनी पोथीचे वाचन केले. हभप तावरे महाराज यांची उपस्थिती होती. सुरूवातीला श्री गजानन महाराजांचे पूजन करण्यात आले.

हरिद्वार येथील महंतांचे आशीर्वाद भाविकांना मिळाले. गजानन महाराज भक्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आयोजनाची बाजू सांभाळली. दुपारी पारायणाची सांगता झाली. शेवटी आरती होउन प्रसाद वितरण करण्यात आले. गजानन महाराजांचा जयजयकार केला.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ११ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कामगारांच्या प्रश्नांवर एसटी प्रशासनाचे वेळकाढू धोरण

## संघटना आक्रमक, सोमवारपासून बेमुदत उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ११ जानेवारी

**यवतमाळ :** विभागातील एसटी कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाने यापूर्वी लेखी आश्वासन दिले होते. मात्र काही मोजके प्रश्न निकाली काढून अनेक महत्त्वाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत प्रशासन वेळकाढू धोरण राबवत असल्याचा आरोप महाराष्ट्र स्टेट ट्रान्स्पोर्ट कामगार संघटनेने केला आहे. या धोरणामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असून कामगारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. त्यामुळे कामगार संघटना आक्रमक झाली असून सोमवार दिनांक १२ जानेवारीपासून बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



यवतमाळ विभागात एसटी कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. हे सर्व मुद्दे संघटनेने यापूर्वीच प्रशासनाच्या निदर्शनास आणले होते. त्यावेळी प्रशासनाने प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्याने नियोजित उपोषण स्थगित करण्यात आले होते. मात्र आजही अनेक प्रश्न तसेच आहेत. शिवाय नव्याने उद्भवलेल्या ज्वलंत मुद्द्यांकडे प्रशासन डोळेझाक करीत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (ता. ९) प्रशासन व संघटनेची बैठक झाली. मात्र ही बैठक निष्फळ ठरल्याने महाराष्ट्र स्टेट ट्रान्स्पोर्ट कामगार संघटना सोमवारपासून बेमुदत उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट झाले आहे. संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये रोजंदारीवर कार्यरत चालक-कम-वाहकांना समय वेतन श्रेणी लागू करणे, प्रोत्साहन भत्ता तातडीने अदा करणे व भत्ता न देणाऱ्यांवर कारवाई करणे, चालक-वाहक तसेच यांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीगृहे सुस्थितीत करून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, रात्रवस्तीला जाणाऱ्या चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृहांची व्यवस्था करणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

संघटनेने नियमभंगाच्या बाबी निदर्शनास आणून दिल्यानंतरही कारवाई होत नसल्याने मनमानी वाढली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी अधिकाराचा गैरवापर करून शिस्त व आवेदन कार्यपद्धतीचा भंग करीत द्वेषभावनेतून कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले जात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. वणी आगारात चालकांना निलंबित करण्यात आले असून, हे निलंबन तात्काळ रद्द करून प्रकरण दप्तरी दाखल करावे व या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या सर्व मागण्यांसंदर्भात बेमुदत उपोषणाची नोटीस महाराष्ट्र स्टेट ट्रान्स्पोर्ट कामगार संघटनेचे विभागीय सचिव राहुल धार्मीक यांनी एसटी प्रशासनाला दिली आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# रस्ते व वाहतूक समस्यांवर नागरिक आक्रमक



## मागण्या मान्य न झाल्यास रस्ता रोकोचा इशारा

प्रतिनिधी ११ जानेवारी

**पुसद :** पुसद शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते वाशिम रोडवरील रेस्ट हाऊसपर्यंतच्या मुख्य मार्गावर उभारण्यात आलेले डिव्हायडर, अपूर्ण पायाभूत सुविधा व वाहतूक व्यवस्थेतील त्रुटींमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक पोलिसांना निवेदन देण्यात आले असून, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास रस्ता रोको व उपोषण आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

या मार्गावर मधोमध डिव्हायडर बसवून त्यावर स्ट्रीट लाईटचे खांब उभारण्यात आले आहेत. मात्र गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अद्याप पथदिवे सुरू न झाल्याने रात्री संपूर्ण परिसरात अंधार पसरत असून अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे तात्काळ पथदिवे सुरू करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती चौक (मेडिकेअर मार्गे) व रेस्ट हाऊसपर्यंत सलग डिव्हायडर असल्यामुळे मामा चौक व हेडा मार्ट परिसरात वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या ठिकाणी डिव्हायडर तोडून वळण रस्ता खुला करण्याची मागणी यापूर्वीही करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने वाहनधारक वसंतनगर व बेंडकी मार्गाने उलट दिशेने वाहतूक करत आहेत. परिणामी या परिसरात वारंवार अपघात होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासोबतच श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेस्ट हाऊस व छत्रपती चौक परिसरात आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. छत्रपती चौकातील सिमेंटचा रस्ता निकृष्ट अवस्थेत असून संबंधित ठेकेदारामार्फत तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सिमेंट रस्त्याचे खोदकाम करणाऱ्यांवर चौकशी करून कडक कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनात नमूद आहे.

वरील सर्व मागण्यांची त्वरित पूर्तता न झाल्यास शिवसेना (उबाठा) जिल्हा उपप्रमुख राजू वाकडे यांच्यासह रमेश जांगडे, गजानन निकष, विशाल पाली, आशु प्रजापती, तुषार व्यवहारे, संजय शिंगणे, गजानन पवार, अर्जुन आतांगडे, सतीश निकष, पिंटू कदम, राजू वंजारे, वाल्मीक नागपुरे, रविंद्र ठाकरे तसेच स्थानिक नागरिक रस्ता रोको, उपोषण व तीव्र आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# केमिकलयुक्त दारूने दोन गावे त्रस्त

प्रतिनिधी ११ जानेवारी

**यवतमाळ :** गोपालपूर, आकोली बु. या परिसरात अवैधरीत्या केमिकलयुक्त विषारी दारूची निर्मिती व विक्री खुलेआम सुरू आहे. या बेकायदेशीर धंद्यामुळे गावातील वातावरण पूर्णतः बिघडले असून तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. त्यामुळे शनिवारी या दोन्ही गावातील नागरिकांनी थेट पांढरकवडा पोलिस ठाण्यात धडक देत दारूबंदीची मागणी केली.

या परिसरात मंदिर, शाळा तसेच रहिवासी वस्तीच्या अगदी आसपासच दारू उत्पादन व विक्रीची ठिकाणे सुरू आहे. विशेष म्हणजे केमिकलयुक्त गावठी दारूमुळे काही स्थानिक नागरिकांचा मृत्यू झाल्याचेही ग्रामस्थांनी ठाणेदारांच्या निदर्शनास आणून दिले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामस्थांनी यापूर्वीही स्थानिक प्रशासन व संबंधित विभागांकडे तक्रारी केल्या. मात्र, कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

यावेळी गावकऱ्यांनी ठाणेदारांना निवेदन देत अवैध दारू उत्पादक व विक्रेत्यांवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली. अशा ठिकाणांवर सातत्याने नजर ठेवून भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. केमिकलयुक्त दारूमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने त्वरित दारूबंदी करून अवैध व गावठी दारू विक्रीची सर्व ठिकाणे बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली.

# दारूबंदीसाठी महिलांचा पोलीस ठाण्यावर मोर्चा

प्रतिनिधी ११ जानेवारी

**ढाणकी :** ग्रामपंचायतीचा दारूबंदीचा ठराव अस्तित्वात असतानाही बिटरगाव बुद्रुक व परिसरात खुलेआम अवैध दारू विक्री सुरू असल्याने अखेर महिलांचा संयम सुटला. अवैध दारूविक्री तात्काळ बंद करण्यात यावी, या ठाम मागणीसाठी संतप्त महिलांनी एकत्र येत बिटरगाव (बु.) पोलीस ठाण्यावर धडक देत ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना कडक शब्दांत लेखी निवेदन दिले.




निवेदनात महिलांनी स्पष्टपणे आरोप केला आहे की, ग्रामपंचायत बिटरगाव (बु.) अंतर्गत दारूबंदीचा ठराव वर्षानुवर्षांपूर्वी मंजूर झाला असताना प्रत्यक्षात मात्र गल्लीबोळ, वस्ती-वस्त्यांमध्ये अवैध दारू विक्री बिनधास्त सुरू आहे. "या बेकायदेशीर धंद्याला नेमकी कुणाची मूक संमती आहे?" असा थेट सवालही महिलांनी उपस्थित केला आहे.

अवैध दारूमुळे गावातील पुरुष, युवक व तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असून त्याचे गंभीर सामाजिक परिणाम दिसून येत आहेत. घराघरांत वाद, मारहाण, कर्जबाजारीपणा वाढत असून महिलांवरील अन्यायाच्या घटनांतही वाढ होत असल्याचा आरोप करण्यात आला. अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त होत असून शांतताप्रिय गावात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे शाळा, मंदिर तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या आसपासही दारू विक्री सुरू असल्याने लहान मुलांच्या शिक्षणावर व भवितव्यावर विपरीत परिणाम होत आहे. "मुलांच्या हातात वही असताना समोर दारूची बाटली दिसते, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे," अशा शब्दांत महिलांनी आपला संताप व्यक्त केला.

दारूच्या व्यसनामुळे आरोग्यविषयक गंभीर समस्या वाढत असून अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. त्यामुळे संबंधित दारू विक्रेत्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अन्यथा महिलाच रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी महिलांचे निवेदन स्वीकारून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र "फक्त आश्वासन नको, प्रत्यक्ष कारवाई हवी," अशी ठाम भूमिका महिलांनी मांडली आहे.

या निवेदनाच्या प्रतिलिपी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उमरखेड तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना पाठविण्यात आल्या असून प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला आहे.

# पाईपलाईन फुटली : दूषित पाण्याचा पुरवठा

प्रतिनिधी ११ जानेवारी

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील गिरीनगर परिसरात नाल्यालगत टाकण्यात आलेली पाणीपुरवठ्याची पाईपलाईन फुटल्याने नागरिकांच्या घरांपर्यंत अत्यंत दूषित पाणी पोहोचत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींमध्ये संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, ही पाईपलाईन तातडीने बदलण्याची मागणी जीवन प्राधिकरणाकडे केली आहे.

गिरीनगर भागातील सदर पाईपलाईनद्वारे सुमारे १०० घरांना पाणीपुरवठा केला जातो. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना पोटदुखी, जुलाब, उलटी, मळमळ अशा तक्रारी जाणवत होत्या. या पार्श्वभूमीवर रहिवासी दिनकर कुंदोजवार यांनी पाण्याचा नमुना सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, यवतमाळ येथे तपासणीसाठी दिला. तपासणी अहवालात सदर पाणी पिण्यास पूर्णतः अयोग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अहवालानुसार पाण्यात कोलोफॉर्म्सचे प्रमाण १६ पेक्षा अधिक आढळून आले असून थर्मोटोलरंट कोलोफॉर्म्स ०३ आढळले आहेत. त्यामुळे असे पाणी आरोग्यास अत्यंत घातक ठरते. या पाण्यामुळे कॉलरा, टायफॉईड, कावीळ, अतिसार यांसारख्या गंभीर आजारांचा धोका संभवतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

### नगरसेवकांनी घेतली दखल

- परिसरातील सौरव राऊत व अन्य नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर नगरसेवक पिंटू बांगर यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली. त्यांनी जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत उमप यांच्याशी संपर्क साधून नाल्यालगत असलेली जुनी व फुटलेली पाईपलाईन तात्काळ बदलण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाने कोणताही विलंब न करता पाईपलाईन बदलून स्वच्छ व सुरक्षित पाण्याचा पुरवठा करावा, अशी जोरदार मागणी गिरीनगर परिसरातून होत आहे.

# शेंबाळ पिंपरीत अवैध धंद्यांना उधाण

## वरिष्ठांच्या आदेशांना केराची टोपली, ग्रामस्थांचा संताप

प्रतिनिधी ११ जानेवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले असतानाही शेंबाळ पिंपरी परिसरात मात्र या आदेशांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. स्थानिक पोलिसांच्या कथित आशीर्वादामुळे वरळी मटका, जुगार, गुटखा तसेच खानावळीत सुरू असलेली अवैध दारू विक्री बिनधास्त सुरू असल्याने गावात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

खंडाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेंबाळ पिंपरी येथे काही स्थानिक पोलिसांनी ठरावीक वेळेचे बंधन घालून दोन वरळी मटका व्यावसायिकांना मूक परवानगी दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या व्यावसायिकांनी गावात सुमारे २० एजंट नेमले असून बसस्थानक परिसरातील हॉटेल, चहाच्या टपऱ्या, पानटपरी व सलूनमध्ये खुलेआम वरळी मटका खेळविला जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

वरळी मटक्यात "एकाचा दहा" असा मोहक भाव दिला जात असल्याने नागरिकांची मोठी गर्दी होत असून बसस्थानक परिसराला जणू यात्रेचे स्वरूप आले आहे. याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी व तरुण वर्गाला बसत असून मोठ्या प्रमाणावर युवक व्यसनाधीनतेकडे वळत असल्याने पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. याशिवाय शेंबाळ पिंपरीपासून चार किलोमीटर अंतरावर, पोफाळी व खंडाळा पोलीस स्टेशनच्या सीमेवर असलेल्या भांबरखेडा फाट्यावर मोठा जुगार अड्डा सुरू असल्याचा धक्कादायक आरोप ग्रामस्थांनी केला आहे. स्थानिक पोलिसांच्या संरक्षणाखाली या अड्ड्यावर दररोज २० ते २२ लाख रुपयांची उलाढाल होत असल्याची चर्चा असून या ठिकाणीही मोठी गर्दी होत आहे. परिणामी परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अवैध गुटखा विक्री आणि खानावळीत सुरू असलेल्या दारू व्यवसायामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत चालले आहे. अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावत असून घरगुती वाद, भांडणे आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढताना दिसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या सर्व प्रकारांमुळे शेंबाळ पिंपरी ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून संबंधित पोलिसांची चौकशी करावी व परिसरातील सर्व अवैध धंदे बंद करावेत, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये फुलतेय लेखन-सर्जनशीलता

## 'सिखें' उपक्रमामुळे प्राथमिक शाळांमध्ये लेखनाची गोडी

**यवतमाळ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सिखें' संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला आणि सर्जनशीलतेला नवी दिशा मिळत आहे. या उपक्रमांतर्गत देण्यात आलेल्या भाषा विषयाच्या कार्यपुस्तिकांमुळे विद्यार्थी स्वतःच्या शब्दांत गोष्टी लिहू लागले असून, प्राथमिक शाळांमधूनच 'छोटे लेखक' घडत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

'सिखें' संस्थेच्या टीआयपी प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना दिलेल्या 'गोष्ट कशी लिहावी?' या मार्गदर्शनाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या लेखनावर दिसून येत आहे. इयत्ता दुसरी व तिसरीतील विद्यार्थीही आता कल्पक गोष्टी लिहित असून, गोष्टींना साजेसे चित्र, आकर्षक शीर्षक आणि तात्पर्य मांडण्याचा आत्मविश्वास त्यांनी मिळवला आहे. अनेक विद्यार्थी भविष्यात लेखक-लेखिका होण्याची इच्छा व्यक्त करत आहेत.



या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना केवळ धडे वाचण्याऐवजी 'लेखक म्हणून विचार' करायला शिकवले जाते. गोष्टीचे पात्र, स्थळ, काळ, समस्या आणि उपाय ओळखण्याच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची विश्लेषण क्षमता वाढत आहे. 'पुढे काय घडेल?', 'हे पुस्तक कशाबद्दल असेल?' अशा प्रश्नांच्या माध्यमातून त्यांच्या तर्कशक्तीला चालना दिली जात आहे.

पात्रांच्या स्वभावावर चर्चा, रिकाम्या जागा भरून गोष्टी पूर्ण करणे यामुळे भाषेवरील प्रभुत्व वाढत असल्याचे शिक्षकांचे मत आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ तसेच लेखक व चित्रकार यांची ओळख करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण होत असल्याचे जिल्हा परिषद शाळा खानगाव येथील भाषा शिक्षिका संगीता बनसोड यांनी सांगितले.

### 'सिखें' उपक्रमातून विचारशील पिढी घडते

- विद्यार्थी जेव्हा स्वतः गोष्टीचा आराखडा तयार करतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो. केवळ साक्षर नव्हे, तर स्वतंत्रपणे विचार करणारी पिढी घडविण्यासाठी 'सिखें'ची अध्यापन पद्धती उपयुक्त ठरत असल्याची प्रतिक्रिया मुख्याध्यापक ज्ञानेश्वर भगत यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन-लेखनाची आवड निर्माण होत असून शिक्षकांमधूनही समाधान व्यक्त होत आहे.

# उमरखेडमध्ये गुन्हेगारीला आळा

## खून, जबरी चोरी, दुखापतीत लक्षणीय घट

प्रतिनिधी ११ जानेवारी

**उमरखेड :** उमरखेड पोलिसांनी सन २०२५ मध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या कामगिरीचा सविस्तर आढावा ठाणेदार शंकर पांचाळ यांनी १० जानेवारी रोजी पोलीस ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत मांडला. प्रभावी प्रतिबंधक कारवाई, रात्रगस्त, रोड पेट्रोलिंग आणि सराईत गुन्हेगारांवर कडक पावले उचलल्यामुळे अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये घट झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खुनाच्या गुन्ह्यांमध्ये सन २०२४ मधील ३ गुन्ह्यांच्या तुलनेत सन २०२५ मध्ये २ गुन्हे दाखल होऊन एकाची घट झाली आहे.



आठवडी बाजारात दोन गुन्हेगारी गटांतील संघर्षातून झालेल्या खुनाच्या घटनेतील सर्व आरोपी निष्पन्न करून त्यांच्यावर मोक्का कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली. तसेच दुसऱ्या गटाविरुद्ध खुनाचा प्रयत्न व भा.न्या.सं. कलम १११ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून एका आरोपीविरुद्ध एमपीडीए प्रस्ताव जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे.

खुनाचा प्रयत्न या प्रकारात सन २०२५ मध्ये ६ गुन्हे दाखल झाले असून, ही केवळ नगण्य वाढ आहे. दरोड्याच्या गुन्ह्यांत मात्र दोन्ही वर्षांत प्रत्येकी एकच गुन्हा नोंदवला गेला असून वाढ रोखण्यात पोलिसांना यश आले आहे. जबरी चोरीच्या गुन्ह्यांत मोठी घट नोंदवली गेली असून २०२४ मधील ११च गुन्ह्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये केवळ ६ गुन्हे दाखल झाले आहेत. घरफोडीच्या ९ गुन्ह्यांपैकी ७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांतही घट झाली असून २४ पैकी १२ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. मालमत्तेविरुद्धचे गुन्हे नियंत्रणात आणण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन, नाकाबंदी व सातत्यपूर्ण पाळत प्रभावी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. सन २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधक कारवाई, तडीपार, दारुबंदी, जुगारविरोधी मोहिमा राबवण्यात आल्या. एमपीडीएअंतर्गत तीन सराईत गुन्हेगारांवर, तर आठवडी बाजारातील खुनाच्या प्रकरणात १२ आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली.

शिवजयंती, आंबेडकर जयंती, राम नवमी, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, नवरात्रोत्सव तसेच नगर परिषद निवडणुका कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडल्या. डी.जे. बंदीबाबत सर्व समाजघटकांनी दिलेल्या सहकार्यामुळे उमरखेडची सकारात्मक ओळख निर्माण झाल्याचे ठाणेदार पांचाळ यांनी नमूद केले. जनतेच्या सहकार्यामुळेच कायदा व सुव्यवस्था राखण्यात यश मिळाले असून, पुढील काळातही विश्वासार्ह आणि प्रभावी पोलीस प्रशासन देण्याची भूमिका कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

- रेती चोरीच्या गुन्ह्यांत वाढ झाली असली, तरी महसूल विभागाशी समन्वय साधून यापुढेही कठोर कारवाई करण्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला. दंगलीच्या गुन्ह्यांत ४ घटनांची, तर दुखापतीच्या गुन्ह्यांत तब्बल ३३ गुन्ह्यांची घट झाली आहे. अदखलपात्र गुन्ह्यांत तातडीने हस्तक्षेप करून तंटे मिटविण्याची भूमिका यामागे कारणीभूत ठरली आहे.

# जिजाऊ प्रचार रथाचे शिवभक्तांकडून स्वागत

प्रतिनिधी ११ जानेवारी

**उमरखेड :** मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे दि. १२ जानेवारी रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय जिजाऊ जन्मोत्सवाच्या ऐतिहासिक सोहळ्यास तालुक्यातील जास्तीत जास्त जिजाऊभक्तांनी उपस्थित राहावे, या उद्देशाने काढण्यात आलेल्या जिजाऊ प्रचार रथाचे उमरखेड तालुक्यात ठिकठिकाणी शिवभक्तांकडून उत्स्फूर्त व जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.




मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील प्रत्येक गावात जिजाऊ जन्मोत्सवाचा संदेश पोहोचवण्यासाठी हा प्रचार रथ तयार करण्यात आला आहे. रथ गावागावांत पोहोचताच फटाके, ढोल-ताशे आणि घोषणांनी परिसर दुमदुमून जात असून ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या प्रचार रथाच्या माध्यमातून जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये जिजाऊ जन्मोत्सवाबाबत मोठा उत्साह व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असल्याचे मत विभागीय अध्यक्ष सुरेश कदम, राज्य कार्यकारिणी सदस्य वसंतराव देशमुख तसेच जिजाऊ सेवा परिषद जिल्हाध्यक्ष पी. डी. शिंदे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील हजारो जिजाऊभक्त या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि.११जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# तालुका कृषी अधिकाऱ्याची मर्जी, अनुदान वाटप फर्जी !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात खळबळ उडवून दिलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोखरा या योजनेतील गैरप्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे.तत्कालीन तालुका कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केवळ मर्जीतल्या काही निवडक लाभार्थ्यांच्या कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान दिले असल्याचे वास्तव समोर येत आहे.परिणामी मेहरबान असलेल्या कर्मचाऱ्यांनी मर्जीतल्या लाभार्थ्यांना फर्जी अनुदान दिले असल्याचे लवकरच स्पष्ट होणार आहे.तपास अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासाचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असून येत्या काही दिवसांत झालेल्या गैरप्रकाराची माहिती समोर येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलांना सर्वाधिक प्रमाणात सामोरे जावे लागत असल्याची बाब अनेक वेळा सिद्ध झाली आहे.गेल्या काही वर्षांपासून येथील शेतकऱ्यांना कधी अतिवृष्टी, तर कधी कोरडा



दुष्काळ, गारपीट अशा अनेक नैसर्गिक संकटांचा सातत्याने सामना करावा लागत आहे. ही बाब शासनाच्या लक्षात आल्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा या महत्वाकांक्षी योजनेत वाशिम जिल्हा समाविष्ट करण्यात आला आहे. सदर योजनेचा पहिला टप्पा जून २०२४ मध्ये संपला असून या योजनेतील महत्वाचा दुवा असलेल्या कृषी सहायकाच्या मर्जीतून अनेकांना फर्जी अनुदान देण्यात आले असल्याची धक्कादायक माहिती आता समोर येत आहे.परिणामी कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मेहरबानीमुळेच कृषी



**भ्रष्ट शासन, पोकरा मिशन**

सहायक पहेलवान बनले असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे नुकताच सुरु झालेल्या पोकरा योजनेच्या दुसऱ्या टप्प्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

पोकरा योजनेच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील एकूण १४९ गावांचा समावेश करण्यात आला होता. त्यात मालेगाव मधील १७ गावे, कारंजा मधील ३३ गावे, मानोरा तालुक्यातील ३९ गावे, मंगरूळपीर मधील २२ गावे, वाशिम मधील २० तर रिसोड तालुक्यातील १८ गावांची निवड करण्यात आली होती.समस्याग्रस्त गावातील प्रत्येक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. मात्र या योजनेतील कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यातील महत्वाचा दुवा असलेल्या कृषी सहायकांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी निवडक शेतकऱ्यांच्या संगनमताने अनेक शेतकऱ्यांच्या तोंडाला पान उसले असल्याच्या तक्रारी दिवसागणिक पुढे येत आहेत. त्यात सर्वाधिक रिसोड तालुक्यातील असून शेलुखडसे येथेल वंचित शेतकरी आता वरिष्ठ स्तरावर रितसर तक्रारी दाखल करणार असल्याचे अनेक शेतकरी बोलत आहेत.

## 'चोरावर मोर' प्रकरण समोर

रिसोड तालुक्यातील पोकरा योजनेत समाविष्ट असलेल्या गावात. कुठलिही वस्तू खरेदी न करता, 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' या तत्वावर अनेक शेतकऱ्यांच्या नावाने फर्जी देयके देण्यात आली असल्याची खळबळ जनक माहिती हाती आली आहे. आर्थिक स्वार्थ्यांच्या मोहापोटी संबंधित कृषी सहायकाने योजनेच्या मुख्य उद्देशालाच 'खो' देत सदर चलाखी केली आहे. परंतु यात अनेकजण 'चोरावर मोर' झाले असून बँक खात्यात जमा झालेले फर्जी अनुदान 'अर्धे तुम्ही' कराराला तिलांजली देत, स्वतःच हडप करण्यात आले आहे. हा प्रकार खुप गंभीर असून अशा बोगस देयकाची व खरेदी केलेल्या तत्सम वस्तूची सखोल चौकशी होणे खुप गरजेचे आहे. या प्रकरणात ५० टक्के बोगस अनुदान वितरित करण्यात आल्याचे पितळ उघडे पडेल अशी चर्चा होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
गुरुवार दि.२४ जुलै २०२५
सरकारी जागेतील अतिक्रमित विहीर खाजगी सात- बारावरून हटावा
खाजगी व सरकारी जमिनीतील घुसखोरी थांबवा !
'पोकरा' योजनेत घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा
*अनुदान लाटण्यासाठी 'बोगस' बिले सादर * रिसोड तालुक्यात काम अपूर्ण, अनुदान घेतले पूर्ण *पोकरातील सावळागोंधळ चव्हाट्यावर
कृषी सहायकाची मर्जी, अनुदान वाटप फर्जी !
अधिकारी मेहरबान, कर्मचारी पहेलवान
कृषी अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती, कामाची कागदावरच गती...
कुंपनानेच खाल्ली शेती, योजनेची माती
पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...
भ्रष्टअधिकाऱ्यांची लाभार्थ्यांना सुट, स्व-दानासाठी अनुदानाची लुट !
ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..
*पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले * चौकशी व तक्रारीतून धरले ...
सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५
अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपनानेच खाली शेती...
पोकरा योजनेची माती !
* पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी गरज * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि.५ जानेवारी २०२६
अर्थपूर्ण संबंधातून वाढली मुजोरी, गावठाण हद्दीत घुसखोरी !
बुधवार दि.७ जानेवारी २०२६
फळबाग लागवड न करता अनुदान हडपले, भ्रष्टाचाराविरोधात वातावरण तापले !
नियमांचा केला अनादर, अनुदान लाटण्यासाठी बोगस बिले केली सादर..

# थोडक्यात

## यश तुर्के विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पाचवा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उन्हाळी २०२५ या परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर केली आहे. या गुणवत्ता यादीत येथील राजस्थान महाविद्यालयाचा एम.एस.सी. कॉम्प्यूटर सायन्स शाखेचा विद्यार्थी यश ज्ञानेश्वर तुर्के याने विद्यापीठातून पाचवा येण्याचा बहुमान पटकावला आहे. यश तुर्के हे वाशीम शहरातील समाजसेवी ज्ञानेश्वर उर्फ नानाभाऊ तुर्के यांचे सुपूत्र आहेत. त्यांना उन्हाळी २०२५ च्या एम.एस.सी. कॉम्प्यूटर सायन्स विषयामध्ये सीजीपीए ८.९० आहे. अत्यंत चिकाटीने यश ने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान पटकावल्याबद्दल यश तुर्के यांचे विविध स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## क.रा.इन्नानी महाविद्यालयात योग व आहार शिबिर




●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

धावपळीच्या जीवनशैलीत वाढता ताणतणाव, असंतुलित आहार आणि आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात घेता विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तसेच नागरिकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे या उद्देशाने येथील इन्नानी महाविद्यालयात दि.५ ते ९ जानेवारी दरम्यान पाचदिवसीय 'योग व आहार' शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिराच्या पहिल्या दिवशी अमरावती येथील प्रा.विजय गांजरे यांनी सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त अशा योगासनांबरोबरच संतुलित आहाराचे महत्त्व विशद केले.यावेळी त्यांनी जलनेती, सूत्रनेती व वमन या शुद्धीकरण क्रियांचे प्रात्यक्षिक सहभागी योगसाधकांकडून करून घेतले.योग ही केवळ व्यायामपद्धती नसून शरीरशुद्धीचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी गुणवंत पाटील व डॉ.सुशील देशपांडे यांनी मधुमेह व संधिवात असणाऱ्या रुग्णांसाठी उपयुक्त योगासनांचे प्रात्यक्षिक व आहारविषयक सखोल मार्गदर्शन केले.दैनंदिन जीवनशैलीतील योग्य बदलांमुळे या आजारांवर नियंत्रण ठेवता येते, असे त्यांनी नमूद केले.शिबिराच्या शिबिराच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम.पाटील यांनी योग व आहाराचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराजांचा'योग तप याचि नांवें। गळीत व्हावें अभिमानें?'हा अभंग उद्धृत करून योग म्हणजे अहंकार, ताणतणाव व नकारात्मकता दूर करणारे तप असल्याचे स्पष्ट केले. या शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.सुमित अमलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच आयोजन समितीने केले.शिबिरास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह कारंजा शहरातील योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.आरोग्यपूर्ण जीवनासाठी योग, संतुलित आहार, शारीरिक व मानसिक व्यायाम तसेच आनंदी वृत्ती हीच खरी गुरुकिल्ली असल्याचा संदेश या शिबिरातून देण्यात आला.

# आज अनसिंग येथील श्रीमद भागवत सप्ताहाची सांगता

***ह.भ.प.वात्सल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन**

***आज साई मंदिरात महाप्रसादाचे आयोजन**

●सिटी न्युज ब्युरो @ अनसिंग●

येथील श्री साई संस्थान चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने साईमंदिरात ४ जानेवारी ते ११ जानेवारी २०२५ पर्यंत श्रीमद भागवत सप्ताहाचे व श्री साई चरित्र पारायणाचे आयोजन करण्यात आले.आज रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता आळंदी येथील ह.भ.प.वात्सल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.त्यानंतर महाप्रसादानंतर या भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा अनसिंग येथील श्री साई मंदिरात श्रीमद भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता श्री साईबाबा व संत अच्युतबाबा यांच्या पादुकांची सुशोभीत रथामध्ये अनसिंग नगरीत नगर प्रदक्षिणा करण्यात आली. या सप्ताहामध्ये दररोज पहाटे ५ ते ६ वाजेपर्यंत काकडा, सकाळी ८ ते १० पर्यंत श्री साईचरित्र पारायण, दुपारी एक ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हरिपाठ आणि रात्री ८ ते १० वाजेपर्यंत हरिकिर्तनाचे आयोजन करण्यात आले.या सप्ताहामध्ये भागवत कथा प्रवक्ते म्हणून ह.भ.प.प्रेममुर्ती संतोष ठाकरे ,पुरोहित म्हणून सुशांत गुरू कौंडीण्य तर श्री साई चरित्र पारायण प्रवक्ते म्हणून ह.भ.प.गजानन महाराज भड यांची उपस्थिती लाभली. या भागवत कथा सप्ताहाचे प्रमुख आकर्षण आळंदी देवाची येथील श्री.गजानन महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी ठरले. ४ जानेवारी रोजी रात्री ८वाजता किर्तनकार ह.भ.प.



वेदांताचार्य कैलास येवले आळंदीकर, ५ जानेवारी रोजी ह.भ.प.विनोद वैभव शिवा बावरकर, ६ जानेवारी रोजी ह.भ.प.विठ्ठल महाराज कापसे, ७ जानेवारी रोजी ह.भ.प.गौपुत्र विदर्भ वैभव संजय पाचपोर ,८ जानेवारी रोजी भावरसिक मंगेश गावंडे, ९ जानेवारी रोजी ह.भ.प.अविनाश भारती महाराज, आणि१० जानेवारी रोजी ह.भ.प. अजय महाराज महाजन यांचे किर्तन मोठ्या



उत्साहात पार पडले.या किर्तनाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला. या भागवत सप्ताहात काकडा च्या वेळी सखाराम सावके, अरूण लांडगे, बाबुराव वाबळे, प्रफुल्ल ठोंबे, विठ्ठल ढगे, रूषीकेश लांडगे यांनी सहभाग घेतला.तर किर्तन व हरिपाठामध्ये ह.भ.प.विठ्ठल महाराज कापसे व त्यांच्या आळंदी येथील श्री गजानन महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. किर्तनाची साथ गायनाचार्य ह.भ,प. भागवत मारकड, ह.भ.प. भिमाशंकर दहीफळे, ह.भ.प. अमोल महाराज माळेकर यांनी तर मृदुंगाचार्य म्हणून याह.भ.प. विशाल महाराज शिंदे यांनी साथ दिली.या भागवत सप्ताहात अनसिंग पंचक्रोशीतील अनसिंग, खडसिंग, देगांव, एकांबा, सापळी, जवळा, उमरा कापसे, उमरा मोठा, शेलु बुद्रुक, शेलु खुर्द, उमराळा, सोंडा, पिंपळगाव, ब्रम्हा, वाई, वारला, ढिल्ली, घोटा, सावळी, पन्हाळा, निंबाळवाडी, टणका, जयपूर, चिंचखेडा, नांदगाव, शिवणी येथील भजनी मंडळीने साथ देवून या भागवत सप्ताहाची शोभा वाढविली. रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत ह.भ.प. वात्सल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे.या महाप्रसादाचा परिसरातील भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री साई संस्थानचे अध्यक्ष राजु शृंगारे, उपाध्यक्ष विलास ठाकूर, सचिव चंद्रकांत देवळे, सहसचिव नंदकिशोर गावंडे, कोषाध्यक्ष कुंडलिक भोयर, विश्वस्त दीपक निंबेकर, ज्ञानबा पुंड, गजेंद्र देवळे, संजय जवंजाळे यांनी केले आहे.

# जॉबकार्ड योजनेपासून शेतकरी वंचित

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

मौजे काळी (कारंजा) येथील शेतजमीन सन २०१७ - १८ पुर्वी गट ग्रामपंचायत खेर्डा मध्ये समाविष्ट होती.परंतु सन २०१८ नंतर ही शेतजमीन कारंजा नगर परिषदच्या हद्दवाढ मध्ये समाविष्ठ झाली असुन आम्ही शेतकरी कारंजा या शहरामध्ये राहत असुन उदा.नामे संतोष किसनराव मेहसरे यांची जमीन काळी (कारंजा) मध्ये सर्वे नंबर १०९ क्षेत्र १ हे ९३ आर.असुन यांच्या स्वतःच्या मालकीच्या शेतातील विहीर सन २०१२ मध्ये अर्धी खचली होती.तद्नंतर यावर्षी अतिपावसामुळे ती पुर्ण खचलेली आहे मी सन २०१२ मध्ये मा.संजयभाऊ राठोड महसुल मंत्री व मा. तहसिलदार साहेब, कारंजा (लाड) यांचेकडे खचलेल्या विहीरीच्या दुरुस्ती करून मिळणे बाबत अर्ज सादर केला होता.परंतु या शेतकऱ्याकडे जॉबकार्ड नसल्यामुळे पंचायत समिती विभागाने यांचाअर्ज नामंजुर केला.तसेच कारंजा शहरामध्ये असे बरेचशे शेतकरी असुन त्यांची शेती कारंजा लगत २० ते २५ कि.मी.अंतरावर समाविष्ट आहे.परंतु अशा सर्व शेतकऱ्यांना जॉबकार्ड नसल्यामुळे खचलेल्या विहीरीबाबत व इतर शेतीसंबंधी शासकीय योजनेचा जॉबकार्ड नसल्यामुळे सदरचे शेतकरी नगर परिषद कारंजा च्या हद्दीत असल्यामुळे व नगर परिषद ही ब वर्ग असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा लाभ या शेतकऱ्यांना मिळत नाही व त्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना लाभापासुन वंचित रहावे लागत आहे.तसेच आमचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन फक्त शेती हीच असल्यामुळे सदरच्या लाभापासुन आम्हाला वंचीत रहावे लागत आहे.याबाबतचे निवेदन अजय परडीकर, संतोष परसवार, संतोष मेहसरे, राजू ठोसरे, मोहम्मद इब्राहिम, बबन ढाकूलकर, अहमदबेग मुनवर बेग, सुभाष ढाकुलकर, एजाज अली इस्माईल अली, दिपक गुल्हाने, सुरेश रेवाळे करामत खॉ रहेमतुल्ल खॉ, राजेश निंबाळकर यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

# अनेक लाडक्या बहिणींचे अनुदान जमा झालेच नाही !

***अनुदानाअभावी लाडक्या बहिणींचे नियोजन बिघडले *अनुदान केव्हा येईल या प्रतिक्षेत लाडक्या बहिणी**

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

२०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने महिलांना पंधराशे रुपये महिना देणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. निवडणुकीपूर्वीच लाडक्या बहिणीच्या खात्यात खटाखट पैसे टाकल्याने लाडक्या बहिणींनी भरभरून मतदान केले. याचा महायुती सरकारला निवडणुकीत मोठा फायदाही झाला. त्यामुळे शासनाने लाडक्या बहिणीच्या अनुदानाची रक्कम पंधराशे वरून २१०० रुपये इतकी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र २०२४व२५ संपले असतानाही अजून पर्यंत २१०० रुपयाचा हप्ता लाडक्या बहिणींना मिळाला तर नाहीच परंतु अनेक लाडक्या




बहिणीचे पंधराशे अनुदान जमा झाले नसल्याचे वास्तव आहे. परिणामतः लाडक्या बहिणीचे आर्थिक नियोजन बिघडले आहे. परिणामतः अनेक लाडक्या बहिणींनी नाराजी व्यक्त करीत सत्ताधारी युती सरकारच्या विरोधात निषेध व्यक्त करीत आहेत. मागील वर्षाच्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून १५०० रुपये अनुदान जाहिर केले होते. त्या निवडणुकीत लाडक्या बहिणीकडून कडून भरघोस मतदान मिळाल्याने पंधराशे रुपये अनुदानात वाढ करून २१०० अनुदान देऊ अशी शासनाने घोषणा केली होती. मात्र ती घोषणा हवेतच असून लबाड फसव्या सरकारने आता अनेक लाडक्या बहिणीचे पंधराशे रुपये अनुदान सुद्धा बंद केल्याचे अनेक महिलाकडून सांगण्यात येते. काही झाले तरी लाडकी बहीण योजना बंद करण्यात येणार नाही अशी ग्वाही वारंवार शासनाने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्या अनुषंगाने अनेक लाडक्या बहिणींनी आपल्या घरगुती कामासाठी नियोजन आखले होते.

# कवठा येथे महामेळावा; लाभार्थींच्या तक्रारींचा निपटारा !

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

**सिंचन विहीर व घरकुल तक्रारींचा निपटारा करण्यासाठी रिसोड पंचायत समितीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कवठा जिल्हा परिषद सर्कल येथे ९ जानेवारीला तक्रार निवारण महामेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जवळपास २१५ लाभार्थींच्या तक्रारी ऐकून घेत येत्या आठवड्यात त्याचा निपटारा करण्याची ग्वाही रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन खुळे यांनी दिली.**




ग्रामीण भागातील लाभार्थींना सिंचन विहीर व घरकुल अनुदान वेळेवर मिळावे, अशी अपेक्षा असते. कधी तांत्रिक अडचणी, कधी त्रूटी तर प्रशासकीय दिरंगाईमुळे अनुदान मिळण्यास विलंब होतो. सिंचन विहीर व घरकुलाचे अनुदान मिळाले नाही, घरकूल मंजूर आहे; परंतू जागा नावावर नाही किंवा अतिक्रमित जागा नियमाकूल नाही व इतर तक्रारींमुळे लाभार्थींना मनस्ताप सहन करावा लागतो. यावर गावस्तरावरच तोडगा निघावा याअनुषंगाने माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक यांनी गटविकास अधिकारी गजानन खुळे यांच्याशी चर्चा केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे यांच्या मार्गदर्शनात गटविकास अधिकारी खुळे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तक्रार निवारणासाठी कृती आराखडा आखला आहे. रिसोड तालुक्यात जिल्हा परिषद सर्कलस्तरावर तक्रार निवारण मेळावा घेण्यात येणार आहे. ९ जानेवारी रोजी कवठा येथे तक्रार निवारण मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला गटविकास अधिकारी गजानन खूळे, माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक, माजी पं.स. सभापती बबनराव हरिमकर, माजी पंचायत समिती सदस्य नंदूभाऊ देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य गौतम भगत, संतोष वानखडे यांच्यासह कवठा, चिखली, किनखेडा, व्याड, घोटा, पेडगाव, देऊळगाव बंडा, वनोजा, चिंचाबा पेन येथील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, लाभार्थींसह जवळपास ५०० नागरिकांची उपस्थिती होती. स्वप्नील सरनाईक यांनी प्रास्ताविक केले. लाभार्थींच्या तक्रारी ऐकून त्या सोडविण्यासाठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, अभियंते व अन्य कर्मचाऱ्यांची चमू प्रथमच कवठा येथे आल्याचा आवर्जून उल्लेख केला. पंचायत समितीची संपूर्ण चमू गावात आल्याने लाभार्थींनी आपल्या तक्रारी मांडून त्याचे निराकरण करावे, यापुढेही काही अडचणी, शंका किंवा तक्रारी असतील तर आवर्जून कळवाव्या, असे आवाहन स्वप्नील सरनाईक यांनी केले. गटविकास अधिकारी गजानन खुळे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उद्देश स्पष्ट केला. जवळपास २१५ लाभार्थींच्या तक्रारी, समस्या ऐकून घेत शंकांचे निरसन केले.

**जिल्ह्यातील पहिलाच अनोखा उपक्रम**

कवठा येथील सिंचन विहीर व घरकुल योजना तक्रार निवारण मेळावा हा जिल्ह्यातील पहिलाच अनोखा उपक्रम ठरला आहे. सिंचन विहीर व घरकुल अनुदानाचे प्रलंबित हप्ते, घरकुलासाठी अतिक्रमित जागेचे नियमनाकुल प्रस्ताव व अन्य तक्रारींची एका रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात आली. प्रलंबित अनुदान येत्या आठवड्यात लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होईल.अशी ग्वाही गटविकास अधिकारी खुळे यांनी दिली.

**२१५ लाभार्थींना दिलासा**

कवठा जिल्हा परिषद सर्कल तक्रार निवारण मेळाव्यात आपल्या तक्रारी नोंदवून देणाऱ्या २२५ लाभार्थींच्या तक्रारींचे निराकरण होणार आहे. त्यामुळे त्यांना दिलासा मिळणार असून, यापुढेही कोणाला काही अडचणी असल्यास अवश्य संपर्क साधावा, असे आवाहन गटविकास अधिकारी गजानन खुळे, माजी जि.प. सदस्य स्वप्नील सरनाईक यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जनतेच्या मनात बदल, बाजारपेठेत 'मशाल' पेटणार !

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** राजकारण असो वा समाजकारण, जनसेवेचा वारसा घेतलेले नेतृत्वच जनतेच्या गळ्यातील ताईत बनते. हेच चित्र सध्या अकोल्यातील प्रभाग क्र. १२ (ड) मध्ये पाहायला मिळत आहे. शिवसेना (उबाठा) उमेदवार सागर भारुका यांच्या रॅलीत हजारो शिवसैनिक सहभागी झाले असून, त्यांच्या 'शक्ती प्रदर्शना'ने प्रभागात राजकीय वातावरण तापले आहे.

भाऊंच्या रॅलीला गल्लीगल्लीत प्रतिसाद खोलेश्वर, राधाकिसन प्लॉट, पत्रकार कॉलनी या भागात सागर भारुका यांच्या रॅलीला व्यापक प्रतिसाद मिळाला. नगरसेवक नसतानाही प्रभाग ११ मध्ये केलेल्या विकासकामांच्या जोरावर सागर भारुका आता प्रभाग १२ (ड) मधून 'मशाल' या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या या रॅलीमुळे शिवसैनिकांमध्ये मोठा उत्साह संचारला असून, आगामी निवडणुकीत ते भाजपचे उमेदवार अजय शर्मा यांना मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा प्रभागात रंगली आहे. समाजसेवेचा वसा आणि विकासाचा ध्यास सागर भारुका यांनी प्रभाग ११ मध्ये आपल्या अष्टपैलू कार्यातून विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

आजच्या रॅलीत सागर भारुका यांना मदत केली ती किरण ठाकूर, रणजीत ठाकूर, सोनु मिश्रा, विनोद गायकवाड, सुनील शुक्ला, शुभम तिवारी, देवा शर्मा, आकाश ठाकूर, दिलीप अग्रवाल, पारस खंडेलवाल, राजु शर्मा, संजय शाह, दिपक खत्री, मन्नु अग्रवाल, महेंद्र ठाकूर, पवन जोशी, गोलू खोलिया, कृष्णा तिवारी, आकाश गावंडे, पंकज ढाबाडे, शाम शाहू, देवेंद्र वखारीया, शेरु मिश्रा, संतोष उटाले, नारायण तायडे, आकाश मिश्रा, योगेश भानुशाली, विकास तिवारी, आयुष श्रीवाल, लोकेश राऊत, संदीप ठाकूर, भरत केजडीवाल, अंकुश ठाकूर, कैलास तिवारी, पप्पू अण्णा, सुभाष चौधरी, जिग्नेश मेहता, दीपक पाटील, दूर्गा श्रीवास्तव, राजकमल ठाकूर या सह शेकडो शिवसैनिक रॅलीत सहभागी झाले होते.

### ♦ सागर भारुकांच्या रॅलीला शिवसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





### सागर भारुका यांचे जनकार्य

◆ मोफत नेत्र तपासणी आणि नियमित रक्तदान शिबिरांचे आयोजन केले गेले. प्रभागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ३२ ते ३५ सबमर्सिबल पंप बसवले. कोरोना संकट संकटकाळात ६०० ते ८०० कुटुंबांना किराणा किटचे वाटप करून आधार दिला. भव्य क्रिकेट टूर्नामेंट, गणेश मूर्ती सजावट स्पर्धा आणि श्रावण महिन्यात कावडधारकांसाठी विशेष सेवा केली आहे. स्थानिक नागरिकांचा दांडगा विश्वास 'प्रभाग ११ मध्ये जसा कामाचा धडाका लावला, तसाच जनसेवक म्हणून प्रभाग १२ (ड) मध्ये देखील भारुका उत्तम कार्य करतील,' असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### बाजारपेठेत शिवसेनेची मशाल पेटणार

◆ सागर भारुका यांच्या रॅलीत हजारो शिवसैनिकांच्या उत्स्फुर्त सहभागातून ही रॅली यशस्वी झाली आहे. खोलेश्वर, राधाकिसन प्लॉट, पत्रकार कॉलनी या भागात व्यापक प्रतिसाद मिळाला. तरुण आणि तरुणींचा उत्साह या रॅलीत होता. त्याच बरोबर या रॅलीनंतर निघालेल्या पदयात्रेत स्थानिकांचा सहभाग होता. सागर भारुका यांच्या शक्ती प्रदर्शनाने शिवसैनिकांमध्ये उत्साह होता. सागर भारुका यंदा भाजप उमेदवाराला पाडण्यासाठी सज्ज असल्याची चर्चा बाजारपेठेत आहे. बाजारपेठ या मुख्य एरियात शिवसेनेचा भाजपला धक्का बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# विरोधक सोशल मिडियावर व्यस्त..... जुन्या शहराच्या मातीत राजेश मिश्रांचा डंका

प्रतिनिधी ११ जानेवारी

**प्रभाग १७ मध्ये भगवे वादळ, शिवसेनेचा शक्तीप्रदर्शनाने धडाका**
**शिवसेनेच्या प्रचार रॅलीला जनसामान्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या रणधुमाळीत प्रभाग क्र. १७ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेनेचे अधिकृत उमेदवार आणि विभागाचे खंबीर नेतृत्व शिवसेनेच्या धनुष्यबाण या निशाणीवर राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली आज प्रभागात भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. हरिहर पेठ, भीमनगर या भागात 'ना झुटी शान ना झुटा अभिमान, मेरा काम ही मेरी पहचान' या घोषणेसह निघालेल्या या रॅलीत शिवसैनिकांचा आणि स्थानिक नागरिकांचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. मातृशक्तीचा आशिर्वाद प्रभागातील चार ही उमेदवाराला असल्याचे चित्र आजच्या रॅलीतून स्पष्टपणे दिसत होते. शिवसेना पुन्हा प्रभाग १७ मध्ये भगवा झेंडा फडविण्याची तयारी करत आहे. विरोधक सोशल मिडिया स्टार आहे. पण, राजेश मिश्रा हे कट्टर शिवसैनिक असून ते जुन्या शहरातील मातीत भगवा फडविणारे यशस्वी नेतृत्व ठरले आहे. रॅलीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या जनहितार्थ योजनांचाही प्रचार करण्यात आला. राजेश मिश्रा यांना प्रभागात 'सामान्य जनतेसाठी अविरत झटणारे हिंदुत्ववादी नेतृत्व' म्हणून ओळखले जात असून, धनुष्यबाण या चिन्हावर शिक्कामोर्तब करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या रॅलीमुळे प्रभाग १७ मध्ये शिवसेनेने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले असून, विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

### प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार

◆ राजेश मिश्रा यांच्यासह प्रभाग १७ मधील पॅनेलचे इतर उमेदवार सौ. सविता गजानन चव्हाण, सौ. अंकिता चेतन गुजर आणि सौ. गीता रमाशंकर मिश्रा यांनीही या रॅलीत सहभाग नोंदवला. रॅली दरम्यान ठिकठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण केले, तर तरुणांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. राजेश मिश्रा यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागात केलेल्या विकासकामांची पावती म्हणून या रॅलीला 'जनसागर' लोटल्याचे चित्र दिसत होते. प्रचार दरम्यान राजेश मिश्रा यांनी मतदारांशी संवाद साधताना सांगितले की, 'आम्ही केवळ सत्तेसाठी नाही तर सेवेसाठी राजकारणात आहोत.' त्यांच्या कार्यकाळातील काही प्रमुख कामांचा उल्लेख यावेळी करण्यात आला. गल्ली-गल्लीत बोअरिंगद्वारे पाणीपुरवठा आणि हायमास्ट दिव्यांद्वारे प्रकाश व्यवस्था राजेश मिश्रा यांनी केली.

### लढाऊ कार्यकर्ता अशी ओळख कायम

◆ राजेश मिश्रा यांची शिवसैनिक म्हणून असलेली ओळख कायम आहे. रेल्वे स्टेशन मुख्य प्रवेशद्वारास 'छत्रपती शिवाजी महाराज' आणि दुसऱ्या प्रवेशद्वारास 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचे नाव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राजेश मिश्रा यांनी केले. कोरोना काळात केलेली रुग्णसेवा, गरजू कुटुंबांना रेशन कार्ड व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. प्रभागात खुल्या मैदानात बगीच्यांची निर्मिती केली.









खा.अनुप धोत्रे यांच्या नेतृत्वात प्रभाग क्रमांक १५ मध्ये भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीला मोठ्या संख्येत स्थानिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. भाजप उमेदवार हरिश आलिमचंदानी, मनिषा भंसाली, बाळ टाले यांच्या प्रचारासाठी ही यशस्वी रॅली निघाली. या रॅलीत शेकडो लोकांचा उत्स्फुर्त सहभाग होता.

# दिव्यांग महिलेला व्हीलचेअर देऊन चेहऱ्यावर फुलवले हास्य

प्रतिनिधी ११ जानेवारी

**अकोला :** निवडणुकी नंतर विजय प्राप्त झाल्यावर प्रभागाचा सर्वांगीण विकास व नागरिकांच्या सेवेसाठी आश्वासनांची खैरात अनेक उमेदवार करत असतात. मात्र विजयाची वाट न पाहता प्रत्यक्ष कृतीतून समाजसेवेचा आदर्श निर्माण करण्याचे कार्य प्रभाग क्र. १२( क) मध्ये प्रचारादरम्यान जगदीश सुखवंतसिंग घुमन यांनी केले आहे. प्रचाराच्या दरम्यान एका दिव्यांग महिलेला हालअपेष्टा सहन करताना पाहताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या खर्चातून त्या महिलेस व्हीलचेअर भेट उपलब्ध करून दिला. या मदतीमुळे त्या महिलेच्या चेहऱ्यावर आनंदाश्रूंसह हास्य उमटले.

शहरातील प्रभाग क्र. १२ मध्ये कचरा, अस्वच्छता, स्वच्छ पाण्याचा अभाव अशा अनेक मूलभूत समस्या आजही कायम आहेत. या समस्यांवर तोडगा काढण्याबरोबरच सामान्य नागरिकांच्या अडचणी ऐकून घेण्यासाठी लोकप्रतिनिधींना वेळ मिळत नसल्याचे चित्र दिसून येते. याच प्रभागात अनेक



नागरिक असेही आहेत, जे शासनाच्या विविध योजनांच्या लाभांपासून अनेक वर्षांपासून वंचित आहेत. जगदीशकौर घुमन यांनी आपल्या विजयाच्या प्रचारासोबतच सामान्य जनतेच्या सेवेला सातत्याने सुरुवात केली असून, त्याचाच एक भाग म्हणून ही सामाजिक बांधिलकी जपली आहे. प्रचारादरम्यान दिसलेल्या त्या दिव्यांग महिलेला मदतीचा हात समाजसेवा व जनसेवेचा वस्तुपाठ घालून दिला आहे.

# शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांना वाल्मिकी समाजाचा पाठिंबा

प्रतिनिधी ११ जानेवारी


### ♦ लोकांनी स्वतःहून जमा केले आर्थिक सहाय्य



**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला असून, प्रभाग क्रमांक १६ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागातील शिवसेना (शिंदे गट) आणि युतीचे अधिकृत उमेदवार रेणू रवी धंजे, वैजयंती राजकुमार मूलचंदानी, राजकुमारी राजकुमार मिश्रा आणि दर्शन (रोशन) राज यांना जनसामान्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सिंधी कॅम्प, कैलास टेकडी या सोळा क्रमांकाच्या प्रभागातील शिवसेना (शिंदे गट) आणि युतीचे अधिकृत उमेदवार रेणू रवी धंजे, वैजयंती राजकुमार मूलचंदानी, राजकुमारी राजकुमार मिश्रा आणि दर्शन (रोशन) राज यांना जनसामान्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारादरम्यान एका महत्त्वाच्या घडामोडीत, वाल्मिकी समाजाने शिवसेना उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांना आर्थिक मदतीची देणगी सुपूर्द केली आहे. समाजाच्या वतीने देण्यात आलेली ही मदत केवळ आर्थिक नसून, ती उमेदवारांवरील विश्वासाचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.प्रभाग १६ मधील रहिवाशांनी 'आपला उमेदवार, आपल्या हक्काचा माणूस' ही भावना जोपासत या निवडणुकीला लोकचळवळीचे स्वरूप दिले आहे. वाल्मिकी समाजाने दिलेल्या या योगदानामुळे शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांचे पारडे जड झाले असून, कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.यावेळी बोलताना उमेदवारांनी सांगितले की, 'जनतेने स्वतःहून दिलेली ही आर्थिक मदत आमच्यासाठी सर्वात मोठी पावती आहे. सामान्यांच्या या पैशाचा आणि विश्वासाचा मान राखून आम्ही प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहोत.' शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवली जात आहे. 'धनुष्यबाण' या चिन्हापुढील बटन दाबून उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

# पातुर वाशिम महामार्गावर चालत्या वाहनाला आग



प्रतिनिधी ११ जानेवारी

**पातूर :** १० जानेवारी रोजी सायंकाळी ७.१५ वाजता मालेगावहून पातूरकडे येत असलेल्या टाटा सुप्रो (क्रमांक एमएच २६ बीसी ३९३७) या चालत्या वाहनाला बोडखा परिसरात अचानक आग लागली. प्राप्त माहितीनुसार, या वाहनात चालकासह चार जण प्रवास करत होते व ते मालेगावहून पातूरकडे जात होते.

वाहनचालक अंकुश बलराम नावकार यांच्या माहितीनुसार, गाडीमध्ये अचानक उष्णता जाणवू लागली आणि क्षणातच वाहनातून धूर निघू लागला. प्रसंगावधान राखत त्यांनी तात्काळ वाहन थांबवले आणि सर्व प्रवासी सुखरूपपणे गाडीतून बाहेर पडले. काही वेळातच वाहनाला भीषण आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वाहन पूर्णपणे जळून खाक झाले.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे सैयद अशफाक व प्रल्हाद वानखेडे अग्निशमन वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिक दुलेखा यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. यावेळी पातूर पोलीस ठाण्याचे हिम्मत राव दिघोळे व इस्माईल मल्ला यांनीही घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण घटनेची माहिती घेतली. रात्रीच्या अंधारात आगीने उग्र रुप धारण केल्यामुळे आग आटोक्यात आणणे अशक्य होते. तरीही प्रयत्न करुन आग नियंत्रणात आणण्याचा प्रत्यत्न झाला. परंतु तो अयशस्वी ठरला.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK